

3 लाख 76 हजार ४४० रूपयाचा मुददेमालासह एक वाहन जप्त PII


# पंढरी संचार

• पंढरपूर • सोमवार, १८ नोव्हेंबर २०२४
• किंमत ₹ ४ • पाने : ८

NO PAIDNEWS NEWSPAPER

pandharisanchar.com RNI-MAH-MAR/1499/2000 • वर्ष २९ • अंक - १७८




कोळी महासंघ, सोनार समाजासह अनेक नेते मंडळींचा दिलीप धोत्रे... PIII

## परिचारकांना गप्प बसवले तेथे मतदारांचे काय ? : सावंत यांचा सवाल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघात निवडणूक लढविण्याची तयारी माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी केली होती. मात्र आमदार समाधान आवताडे यांनी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांकडून परिचारक यांच्यावर दबाव आणून त्यांना शांत बसविले. त्यामुळे अवताडे ही एक हुकूमशाही प्रवृत्ती आहे, त्यांनी परिचारकांना गप्प बसविले तर मतदारांचा आवाज काय चालणार त्यामुळे ही प्रवृत्ती मोडून काढू, असे आवाहन उमेदवार अनील सावंत यांनी केले.

शरद पवार यांना अनेक निवडणुकीत साथ दिली आहे. यांमुळे पवार यांचा मतदारावर विश्वास असल्याने त्यांनी या मतदार संघात मला उमेदवारी दिली आहे. यामुळे पवार यांचा विश्वास मतदार सार्थ ठरवतील यात शंका नाही.

## पवार साहेबांनी नवीन चेहऱ्यास संधी दिली : खा. सुळे

### सावंत यांना विजयी करण्याचे आवाहन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मंगळवेढा :** पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघात खा. शरद पवार यांनी नवीन चेहरा अनिल सावंत यांना उमेदवारी दिली आहे. यामुळे मतदार संघाचा विकास होणार असून मतदाराने अनिल सावंत यांना विजयी करावे असे आवाहन खा. सुप्रिया सुळे यांनी केले.

पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार अनिल सावंत यांच्या प्रचारार्थ मंगळवेढा येथे आयोजित करण्यात आलेल्या सभेत खा. सुळे बोलत होत्या. यावेळी त्या होणाऱ्या यंदाच्या निवडणुकीत खा. पवार साहेब यांनी अनेक मतदार संघात नवीन चेहऱ्यांना संधी देण्याचा » पान ३ वर

## कर्मचाऱ्याने पैसे घेऊन माणसे सोडल्याचा व्हिडिओ व्हायरल

# गोंधळ पुन्हा चव्हाट्यावर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पैसे घेऊन श्री विठ्ठलाच्या दर्शनाच्या रांगेत मधूनच भाविकांना सोडण्याच्या चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून होत होत्या. आज काही नागरिकांच्या सजतेमुळे हा प्रकार करणाऱ्या एका इसमाला रंगेहात पकडण्यात आले आहे, त्याचे व्हिडिओ क्लिप व्हायरल झाले आहे .

मंदिर समितीने ही यावर कारवाई करत त्याच्यावर गुन्हा दाखल केला परंतु हा इसम समितीने नेमलेल्या एजन्सीचा कर्मचारी आहे की कंत्राटी कामगाराचा बनाव केलेला अन्य व्यक्ती आहे याबाबतचा संदेह कायम आहे. मंदिर समितीने नेमलेल्या एजन्सी बाबत अनेक तक्रारी येत होत्या. यातील तथाकथेत जवान हे पैसे घेऊन दर्शन रांगेत घुसखोरी करतात अशा तक्रारी येत होत्या. परंतु मंदिर समितीने कधीही त्यावरती अधिकृत भूमिका घेतली नाही.

आज कासार घाटावरती 700 रुपये घेऊन भाविकांना सोडतानाचा व्हिडिओ काही लोकांच्या हाती लागला, परंतु त्या व्हिडिओमध्ये 'तुझी ड्युटी नसताना यावेळेस तू इथे का आला' अशा प्रकारचे संभाषण आहे , म्हणजे तो कर्मचारी हा संबंधित एजन्सीचाच कर्मचारी आहे असे समजून येते . परंतु मंदिर समितीने दाखल केलेला गुन्हात मात्र अनोळखी व्यक्तीने हा प्रकार केल्याचे सांगण्यात आले आहे. एकूणच मंदिराच्या दर्शन व्यवस्थेबाबत सावळा गोंधळ आहे हे पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहे.

विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात शंकर चनाप्पा भोसले हा इसम मंदिर समितीच्या कंत्राटी सुरक्षा रक्षकाचा पेहराव घालून भाविकांकडून पैसे घेऊन श्री विठ्ठल रुक्मिणी चे दर्शन देतो असे सांगून भाविकांची फसवणूक करताना दिसून आल्याने त्याच्यावर मंदिर समिती मार्फत गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी



राजेंद्र शेळके यांनी दिली.

दिनांक 17 नोव्हेंबर रोजी सकाळी 9 वाजता दर्शनरांगेतील स्थानिक नागरिक / दुकानदार मीनाक्षी जोशी यांना एक इसम, कासार घाट येथे दर्शनबारीत संशयरीत्या तिथे उभा असल्याचा दिसून आला व तो भाविकांना तुम्हाला दर्शन करून देतो, असे म्हणून त्यांच्याकडून पैसे घेत असताना निदर्शनास आल्याने, त्यांनी मंदिर समितीचे तेथील कर्मचारी रोहित दगडू जानगवळी व ऋतिक कल्याण काळे यांना कळवले. तदनंतर माहिती घेऊन संबंधित इसम शंकर चन्नप्पा भोसले ( रा. रांजणी ता. पंढरपूर) यांचेवर मंदिर समितीचे सुरक्षा विभाग प्रमुख राजाराम मारुती ढगे यांनी पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथे भारतीय न्याय संहिता 2023 मधील कलम 318 (4) व 319 (2) अन्वये रितसर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.






## वाहने आडवून लूटमार करणारी टोळी जेरबंद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मोहोळ :** महाराष्ट्र सार्वजनिक विधानसभा निवडणुक २०२४ ची प्रक्रिया चालु असताना मोहोळ पोलीस ठाणेकडील डीबी पथकाला बेकायदेशीर हालचालींवर लक्ष ठेवून त्यावर योग्य ती कारवाई करण्याकरीता उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर आणि पोलीस निरीक्षक सुरेशकुमार राऊत यांनी आदेश दिले होते. त्या अनुषंगाने पोलीस ठाण्यातील स्टाफ पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करीत होते. याप्रसंगी पोलिसांना काही लोक संशयीतरित्या फिरताना दिसले. त्यावेळी त्यांची चौकशी केली असता त्यांच्याकडे धारधार शस्त्रे आढळून आली व त्यांनी सांगितले की आम्ही वाहने अडवून लूटमार करतो. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## पारंपारिक कोळी, मातंग समाजात मोठी फूट

## बाबा अधटराव, उमेश पवार काँग्रेसकडे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** माजी नगरसेवक आणि युवक नेते असलेले उमेश पवार यांनी अनपेक्षित रित्या भगीरथ भालके यांना पाठिंबा दिला. यामुळे मागासवर्गीय विशेषतः मातंग समाजामध्ये मोठी फूट पडली असून हा समाज मोठ्या प्रमाणात पवार यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसशी जोडला जाईल. परिचारक गटाचे प्रभावशाली नेते असलेले लक्ष्मण तात्या पापरकर यांच्या प्रभागांमध्ये उमेश पवार यांचे मोठे वजन आहे ग्राउंड लेव्हलचा कार्यकर्ता म्हणून त्यांचा नावलौकिक असून त्यांनी पूर्वी नगरसेवक म्हणून चांगले काम केले आहे. मुळात पवार हे भारत भालके यांचेच कार्यकर्ते होते. पापरकर यांच्यासारख्या प्रभागामध्ये प्रचंड विरोधी शक्ती कार्यरत असताना देखील सर्व संघर्षाला तोंड देऊन पवार यांनी स्वतःची ओळख निर्माण केली , परंतु भगीरथ भालके यांच्या संपर्कात न राहण्याच्या स्वभावामुळे ते गेल्या काही वर्षांपासून भालके गटाशी दुरावले होते. उमेश पवार यांच्या माध्यमातून पंढरपूर शहरांमध्ये तळागाळात काम करणाऱ्या एक चांगला कार्यकर्ता भालके गटाला मिळाला आहे . आज झालेल्या पदयात्रेमध्ये त्यांनी सहभाग घेऊन आपल्या शेकडो कार्यकर्त्यांना काँग्रेसच्या झेंड्याखाली आणले.

कोळी समाजाचे ज्येष्ठ नेते बाबा अधटराव यांनी देखील भगीरथ भालके यांना पाठिंबा दिला असून या प्रभागातील आणि समाजातील एक मोठा वर्ग आता काँग्रेसच्या पाठीमागे उभा राहील असा विश्वास अधटराव यांनी व्यक्त केला आहे .

### नागेश जाधव यांचे नेतृत्व पुढे

• गोविंदपुरा , कोळी गल्ली ते संपूर्ण नदी भाग पट्ट्यामध्ये येथील दबावामुळे विरोधकांचे पोस्टर देखील लागत नव्हते. यंदा मात्र या दोन नेत्यांसह नागेश जाधव यांच्या नेतृत्वाखाली येथील संपूर्ण मराठा समाज काँग्रेसच्या मागे एकवटला आहे.

## मागास मतदारसंघावर ' डमी आमदार ' उभे करून पाटीलकी करणारी झुंडशाही प्रवृत्ती ठेचून काढू

# मोहोळ चा निकाल महाराष्ट्राच्या राजकारणाचा ट्रेंड बदलणार

खास मुलाखत
अनिरुद्ध बडवे



**मोहोळ :** संविधानाने मागासवर्गीय समाजाची संख्या, तेथील प्रश्न आणि त्यामुळे त्यांना अपेक्षित असणारे प्रतिनिधित्व लक्षात घेता काही मतदारसंघ राखीव ठेवले. परंतु या राखीव मतदार संघात देखील त्या त्या समाजाला मोकळेपणाने संधी न देता , डमी उमेदवार उभे करायचे आणि पडद्यामागून त्यांच्यावर ' पाटीलकी ' गाजवायची ही प्रवृत्ती आम्ही आता ठेचून काढू. मोहोळ चा निकाल हा महाराष्ट्राच्या राजकारणाचा ट्रेंड बदलणारा असेल , असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार राजू खरे यांनी पंढरी संचारशी बोलताना व्यक्त केला.

खरे यांनी सांगितले की , माझ्या समाजाने आयुष्यभर गावकुसाबाहेरची कामे केली . खऱ्या अर्थाने गाडगेबाबांच्या प्रवृत्तीचे स्वच्छता उतरविण्याचे काम या राज्यामध्ये मागासवर्गीय समाजाने केले आहे.

गाव कुसाबाहेरचे जीवन वाट्याला आले तरी देखील समाजाच्या जडणघडणीमध्ये मोलाचे योगदान देत हा महाराष्ट्र घडविण्याचे काम या समाजाने केले . डॉ. भीमराव आंबेडकर यांच्यापासून ते लेखणीचे घाव घालणाऱ्या अण्णाभाऊ पर्यंत सर्वांनीच महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले.

परंतु अजूनही माझी मालकी आणि माझे मालकपण ही प्रवृत्ती काही लोकांतून जात नाही.

संविधानाने दिलेला राखीव मतदार संघाचा अधिकार देखील एक प्रकारे काढून घेत तेथे डमी उमेदवार दिले जातात आणि आपल्या स्वतःचीच प्रवृत्ती तेथे लादली जाते , हे महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी घडते.

मोहोळ मध्ये देखील हे चित्र अनेक वर्षांपासूनचे आहे.

आमदार कोणीही असला तरी राजन पाटील यांचाच दरवाज्यात बांधलेला नेता हवा.

( मुलाखत पान तीन वर )




**सोलापूर :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापुरातील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आज आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री व सुपरस्टार पवनकल्याण यांचा सोलापूर शहरातील विविध रस्त्यांवरून रोड शो आयोजित करण्यात आला आहे. या रोड शोला चाहत्यांची तुफान गर्दी झाली आहे. रात्री सव्वा आठच्या सुमारास या रोड शोला प्रारंभ झाला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला मोठी गर्दी झाली असून वाहतुकीची कोंडी झाली आहे.

# राज्य उत्पादन शुल्क पंढरपूर विभागाची धडक कारवाई

## ३ लाख ७६ हजार ८८० रूपयाचा मुद्देमालासह एक वाहन जप्त

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** विधानसभा निवडणूक 2024 पार्श्वभूमीवर आचारसंहिता कालावधीमध्ये राज्य उत्पादन शुल्क विभाग, पंढरपूर यांनी केलेल्या धडक कारवाईमध्ये आज वाखरी (ता. पंढरपूर) या ठिकाणी देशी मद्याची अवैध वाहतूक करत असताना चारचाकी वाहनासह मद्यसाठा जप्त करून उमेश हिरालाल चव्हाण रा. भाळवणी याच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला असल्याची माहिती निरीक्षक पंकज कुंभार यांनी दिली.

सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेल्या चारचाकी वाहन क्रमांक



एम एच 13 एफ के 6037 असून मुद्देमालाची एकूण किंमत 3 लाख 76 हजार 880 रुपये इतकी आहे. सदरची कारवाई , पुणे विभागाचे विभागीय उपायुक्त सागर धोमकर याच्या निर्देशानुसार, राज्य उत्पादन शुल्क सोलापूर अधीक्षक श्रीमती भाग्यश्री जाधव, उपअधीक्षक एस .आर पाटील याचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. त्याचा पुढील तपास सुरू आहे.

सदरची कारवाई निरीक्षक पंकज कुंभार, दुय्यम निरीक्षक श्रद्धा गडदे, बापू चव्हाण, स. दु. नि. श्री. गुरुदत्त भंडारे जवान श्री. विजय शेळके, प्रकाश सावंत, विनायक वाळूजकर व वाहचालक रामचंद्र मदने यांनी पार पाडली.

संबंधित गुन्ह्याचा पुढील तपास निरीक्षक श्री. पंकज कुंभार हे करत आहेत.

अवैध मद्यविक्री

अवैध धंदे व वाहतूकी विरोधात कारवाई या पुढेही चालू राहणार असून अवैध मद्याबाबत माहिती असल्यास टोल फ्री 18002339999 क्रमांक अथवा व्हॉटस ॲप क्रमांक 8422001133 या कार्यालयास माहिती दिल्यास माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवले जाईल असे निरीक्षक पंकज कुंभार यांनी सांगुन अवैध मद्याबाबतची माहिती कळविण्याचे आवाहन केले आहे.

## दारुची दुकाने राहणार बंद




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** महाराष्ट्रातील 288 जागांवर एकाच टप्प्यात 20 नोव्हेंबरला मतदान होणार आहे. दरम्यान, राज्यभरातील तळीरामांची निवडणुकीमुळे पंचायत होणार आहे. निवडणुकीच्या काळात दारूचे वितरण होऊ नये म्हणून निवडणूक आयोगाने मतदान आणि मतमोजणीच्या दिवशी दारूविक्रीवर बंदी घातली आहे. 18 नोव्हेंबरच्या सायंकाळी 6 वाजल्यापासून 20 नोव्हेंबरपर्यंत मद्यविक्री बंद असणार आहे. तर, 23 नोव्हेंबरला निकाल आहे. या दिवशीही दारु विक्री बंद असणार आहे. या दिवशी दारुची दुकाने, बिअर बार बंद राहणार आहेत.

## औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यामधील कामगाराचे मतदान करण्यासाठी जनजागृती

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ, जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर व इंडस्ट्रीज असोसिएशन ऑफ टेभूर्णी यांच्या वतीने टेभुर्णी औदयोगिक क्षेत्रातील कंपन्यामध्ये जाऊन विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने कंपनीमधील कामगारांनी आपल्या कुटुंबियांसह २० नोव्हेंबर रोजी देशाची लोकशाही मजबूत करण्यासाठी मतदान करावे असे आवाहन करण्यात आले. टेभुर्णी औदयोगिक क्षेत्रात जनजागृतीसाठी औदयोगिक क्षेत्रातील कंपनी व्यवस्थापनाने उस्फूर्तपणे प्रतिसाद देऊन सहकार्य केले. यावेळी कामकारांनी मतदान करणेची प्रतिज्ञा घेतली. इंडस्ट्रीज असोसिएशन ऑफ टेभुर्णी यांच्या वतीने टेभुर्णी औदयोगिक क्षेत्रात कामकागांनी मतदान करण्यासंदर्भात जनजागृती करण्यासाठी मुख्य चौकाचौकात बॅनर्स लावणेत आले आहेत. या प्रसंगी एमआयडीसी चे स्वीप कोअर समिती सदस्य, इंडस्ट्रीज

## » Selected

### लक्ष-लक्ष दिव्यांनी उजळून निघाला अकलाई मंदिराचा परिसर...!



**माळशिरस :** अकलूज गावची ग्रामदैवत श्री अकलाई देवीच्या मंदिरात त्रिपुरारी पौर्णिमानिमीत्त दिपोत्सोव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.मंदिराचे विश्वस्त जयसिंह मोहिते-पाटील, त्यांच्या पत्नी सौ.सुलक्षणादेवी मोहिते-पाटील,कन्या कु. स्वरूपाराणी मोहिते-पाटील व सौ.ऋतुजादेवी संग्रामसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले.त्यानंतर मंदिराच्या दिप माळेवर व परिसरात तेलाच्या वातीच्या पणत्या,मेणबत्ती,टेंभे असे हजारो दिवे प्रज्वलीत करण्यात आले. त्यामुळे मंदिराचा परिसर,दीपमाळा या हजारो दिव्यांच्या प्रकाशाने उजळून निघाला होता.

### त्रिशा निंबाळकर हिचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा



**माळशिरस :** पत्रकार संजय निंबाळकर यांची कन्या त्रिशा हिचा वाढदिवस माळीनगर पवारवस्ती अंगणवाडी शाळा येथे गरजू मुलांना वह्यांचे आणि खाऊचे वाटप करून साजरा करण्यात आला .त्याचबरोबर महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या फोटोंचे वाटप सुद्धा करण्यात आले .यावेळी अंगणवाडी सेविका सौ .आशा हनुमंत कांबळे मॅडम व मदतनीस सौ .दिप्ती शरद दळवी मॅडम तसेच पत्रकार श्री .भारत चव्हाण ,श्री संजय निंबाळकर ,श्री .विजय चव्हाण इत्यादी मान्यवर उपस्थित होते.यावेळी उपस्थित पालक वर्गाने या सामाजिक उपक्रमाबद्दल पत्रकार श्री.संजय निंबाळकर यांचे कौतुक व अभिनंदन केले .

## आ.रामभाऊ सातपुते यांना माळशिरसमधून लीड मिळणार- डॉ. आप्पासाहेब देशमुख

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस :** माळशिरस विधानसभेचे महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार रामभाऊ सातपुते यांना माळशिरस तालुक्यातून लीड मिळणार असल्याचे माळशिरस नगरपंचायत चे कर्तव्यदक्ष माजी नगराध्यक्ष डॉक्टर अप्पासहेब देशमुख यांनी माळशिरस शहरातील कोळी गल्ली या ठिकाणी कॉर्नर सभा घेतली असता येथील प्रचार सभेत बोलताना सांगितले.

माळशिरस विधानसभेची निवडणूक प्रतिष्ठेची केली असून यावेळी विरोधकांचे डिपॉझिट जप्त होईल असे महादेव तूपसौंदर यांनी म्हटले आहे.

सर्वसामान्यांचे आधारवड, गोरगरिबांचे कैवारी असणारे ज्याचे आरोग्य दूत म्हणून ओळख असणारे माळशिरस तालुक्याचे दमदार आमदार राम सातपुते यांनी पाच वर्षात जनतेच्या हृदयात स्थान निर्माण करून जनतेची सेवा केली. अनेकांची मोठमोठे ऑपरेशन केले. अनेकांच्या मदतीला धावून गेले. रात्री अपरात्री कोणाचाही फोन उचलून तुमचं काम झालं समजा अस असं म्हणून त्यांचं काम करूनच दाखवणार. त्यामुळे माळशिरस तालुक्यातील जनता आता पुन्हा रामभाऊ सातपुते आमदारच पाहिजे त्यासाठी अहोरात्र झटत आहेत. माळशिरस नगरपंचायत चे कर्तव्यदक नगराध्यक्ष व धडाडीचे कार्यकर्ते डॉक्टर आप्पासाहेब देशमुख यांनी सर्व तालुक्यातील चक्र फिरवून वातावरण ढवळून टाकलेला आहे. डॉक्टर आप्पासाहेब देशमुख यांना माळशिरस मधून सर्व समाजांनी साथ दिलेली असल्याने माळशिरस मधून चांगल्या मताचे लीड मिळणार असल्याचे सांगितले.

## आ. देशमुख यांच्यामुळे दिला भाजपचा राजीनामा



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर महापालिकेत विरोधी पक्ष नेतेपद भूषविले. तीस वर्षापासून कार्यरत असलेल्या जुन्या, निष्ठावंत कार्यकर्त्यांना भाजपात स्थान नाही. अशा परिस्थितीत पक्षात काम करणे अवघड आहे. त्यामुळे आ. सुभाष देशमुख यांच्या कार्यपद्धतीला कंटाळून आपण भाजपा पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला असल्याची भूमिका माजी विरोधी पक्ष नेते आप्पासाहेब चौगुले यांनी पत्रकार परिषदेत मांडली. दक्षिण विधानसभा मतदारसंघातून आमदार सुभाष देशमुख यांना भाजपने उमेदवारी देऊ नये अशी मागणी भाजपच्याच माजी नगरसेवकांनी यापूर्वी केली होती, असेही ते म्हणाले.

## माळशिरसमध्ये होम वोटिंग चे ९८ टक्के मतदान

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** 85 वर्षाच्या पुढील मतदारांना तसेच दिव्यांग मतदारांना निवडणूक आयोगाने गृह मतदानाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यानुसार 254 माळशिरस विधानसभा मतदारसंघांमध्ये 85 वर्ष वयाच्या पुढील 402 व 38 दिव्यांग असे एकूण 440 मतदारांनी गृह मतदानाचा पर्याय निवडला होता. यापैकी 85 वर्षे वयापुढील 390 तर 38 दिव्यांग बांधवांनी मतदानाचा हक्क बजावला. गृह मतदानाची प्रक्रिया 14 नोव्हेंबर 2024 ते 16 नोव्हेंबर 2024 रोजी पार पडली. यामध्ये 428 मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला त्यापैकी . गृह मतदानाचा पर्याय निवडलेल्या 100% दिव्यांग बांधवांनी मतदान केले.

104 वर्ष वयाच्या छाया चव्हाण, सरुबाई नाईक नवरे, हनुमंत जाधव, अब्दुल मुलानी या ४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. सुविधा केंद्रामध्ये टपाली मतदान प्रक्रिया मध्ये सुरळीत चालू आहे. दिनांक 17 नोव्हेंबर अखेर 897 निवडणूक कर्तव्यर्थ कर्मचाऱ्यांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. निवडणूक कर्तव्यर्थ कर्मचारी यांचे टपाली मतदान 19 तारखेपर्यंत चालू राहील. अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी विजया पांगारकर यांनी दिली आहे.

**पाहिजे**

हॉस्पिटल मध्ये स्टाफ आणि मावशी
शिक्षण:- ANM \ GNM \ १२ वी पास
पत्ता:- कोडलकर हॉस्पिटल
लिंक रोड,पंढरपूर
फोन नंबर :- ८२९१३१५०८९

## दमाणी नगर येथे महायुतीची कॉर्नर सभा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर शहर उत्तर विधानसभा भाजपा महायुतीचे अधिकृत उमेदवार विजय देशमुख यांच्या प्रचारासाठी कॉर्नर सभा दमाणी नगर येथे आयोजित करण्यात आली होती. या सभेत महायुतीच्या सर्व कार्यकर्त्यांनी एकत्र येत विजय देशमुख यांना पूर्ण पाठिंबा जाहीर केला आणि त्यांच्या विजयासाठी पूर्ण ताकदीनिशी काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. याप्रसंगी विजय देशमुख यांच्यासह मान्यवरांनी यावेळी मार्गदर्शन करुन देशमुख यांना मतदान करण्याचे आवाहन केले.यावेळी राष्ट्रवादी शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार, महिला अध्यक्षा संगीताताई जोगधनकर, सुनील खटके, जगन्नाथ चव्हाण, रेखा गायकवाड, अमर दुधाळ, शामराव गागरडे, प्रमोद भोसले, हेमंत चौधरी उपस्थित होते.




## प्रचार सभा...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**मोहोळ :** मोहोळ विधानसभेचे उमेदवार यशवंत माने यांच्या प्रचारासाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रमुख अजित पवार आले असता त्यांचे स्वागत करताना राजन पाटील, कल्याणराव काळे, प्रशांत परिचारक आणि उमेदवार यशवंत माने दिसत आहेत.

## मतदार स्लिप ऑनलाईन मिळवणे अधिक सोपे



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** निवडणूक आयोगाने आता मतदारांना त्यांची मतदार स्लिप मिळवणे अधिक सोपे केले आहे. आधी, मतदारांना मतदान केंद्रावर प्रत्यक्ष जाऊन स्लिप घ्यावी लागायची. मात्र, आता मतदार यादी ऑनलाइन उपलब्ध असून प्रत्येक मतदार आपली मतदार स्लिप सहजपणे डाउनलोड करू शकतो. मतदान प्रक्रियेतील पारदर्शकता आणि सोयीसाठी, मतदान केंद्रांवर प्री-प्रिंटेड QR-कोड असलेल्या मतदार स्लिप्स वापरल्या जाणार आहेत, ज्यामुळे मतदारांची उपस्थिती नोंदवणे सोपे होईल.




## मोहोळ तालुक्यातील टाकळी सिकंदर येथील जाहीर सभेत आवाहन

# महायुती सरकारने अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या : पवार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** राज्यामध्ये महायुती सरकारने अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या असे सांगत त्या योजना पुढे चालू ठेवायच्या असल्यास महायुतीपाठीशी उभे राहून राष्ट्रवादी काँग्रेसचेउमेदवार यशवंत माने यांना विजयी करा असे आवाहन उपमुख्यमंत्री नामदार अजितदादा पवार यांनी मोहोळ तालुक्यातील टाकळी सिकंदर येथील जाहीर सभेत केले .

यावेळी व्यासपीठावर माजी आमदार प्रशांत परिचारक,माजी आमदार राजन पाटील ,पुणे जिल्हा राष्ट्रवादीचे अध्यक्ष प्रदीप गारटकर बाळासाहेब आसबे बाळराजे पाटील कल्याणराव काळे दिनकर मोरे दादा करणावर, मोहोळ तालुकाध्यक्ष सुनील चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रकाश चवरे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख दादा पवार, विद्यापीठ सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील,अनुसूचित जातीचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष संजीव खिलारे आदीसह अनेक महायुतीचे व राष्ट्रवादीचे पदाधिकारी उपस्थित होते.

नामदार अजितदादा यांनी मोहोळ तालुक्यासाठी गेल्या अडीच वर्षात 3200 कोटी रुपयांचा निधी दिला असून आगामी पाच वर्षात यशवंत मानेला आमदार करा 4000 कोटीचा निधी देऊन एकही मोहोळ तालुक्यातील प्रश्न शिल्लक ठेवणार नाही असे आश्वासन मोहोळकराना दिले . यशवंत माने हा तळमळीचा कार्यकर्ता असून प्रामाणिकपणे कार्य करणार आहे. त्यांनी मंत्रालयात झोप न घेता मला पाठीमागे लागून आष्टी उपसा जलसिंचन योजना आचारसंहितेच्या आदल्या दिवशी मंजूर करून घेतली आणि ७७२ कोटीचा निधी मंत्रिमंडळाकडून मंजूर करून घेतला. त्यामुळे मोहोळ तालुक्यातील ९ गावाचा कायापालट होणार असून साडेबारा हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. मला भीमा आणि सीना नदीच्या वर बॅरेज बंधारे बांधण्याची योजना करायचे आहे आणि महाराष्ट्रात नद्या जोड प्रकल्प राबवायचा आहे म्हणून मी पुणे येथील पंतप्रधानाच्या दौऱ्यात पंतप्रधान मोदी यांनाबोलून याविषयीचे आश्वासन घेतले असून मोदी यांनी मला सांगितले की महाराष्ट्रात तुम्ही सरकार आणा मी पुढील साडेचार वर्ष महाराष्ट्रातील एकही प्रश्न शिल्लक ठेवणार नाही इतक्या निधी देतो असे आश्वासन दिले आहे म्हणून मोहोळ तालुक्यातील व मोहोळ विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे यशवंत माने यांना प्रचंड मताने विजयी करा अशी विनंती मतदाराना केली .

राष्ट्रवादी काँग्रेस यांनी मुस्लिम समाजासाठी दहा ठिकाणी विधानसभेसाठी जागा दिल्या असून १ हजार कोटीचा निधी दिला आहे . तसेच मदरसा आणि इतर ठिकाणच्या शिक्षकांचे पगार वाढवलेले आहेत मुस्लिम समाजातील ७५ विद्यार्थ्यांना परदेशी जाण्यासाठी ४० लाख रुपये प्रत्येकी सरकारने मंजूर केले असून मुस्लिम समाजाने आता महायुतीच्या पाठीशी राहावे व विकास करून घ्यावा असे आवाहन त्यांनी समाजाला केले . राष्ट्रवादी काँग्रेस हा सर्व समाजाला एकत्र करून पुढे नेणारा व विकासाचे राजकारण करणारा पक्ष आहे त्यामुळे त्याच्या पाठीशी खंबीरपणे रहा असे आवाहन पण त्यांनी शेवटी केली.

# मोहोळ चा निकाल महाराष्ट्राच्या राजकारणाचा ट्रेंड बदलणार

( मुलाखत पान एक वरून )

जे अकलूज मध्ये दिसते तेच अनगर मध्ये दिसते. हुकूमशाहीचीही एक नवी प्रवृत्ती राजकारणामध्ये रुजलेली आहे , ती उखडून बाहेर काढण्याकरिता माझी उमेदवारी आहे.
विशेष म्हणजे गोरगरीब मराठा समाजाने देखील माझ्या या भूमिकेला पाठिंबा दिला आहे. सर्व समाजाला समानतेने वागवणे आणि प्रत्येकाच्या मनी असलेला सर्वधर्मसमभाव जागवणे हा माझ्या उमेदवारीचा प्रमुख अजेंडा आहे. जेव्हा मी मनोज दादा जरांगे पाटील यांना भेटायला गेलो तेव्हा त्यांच्याशी माझी विस्तृत चर्चा झाली. मी देखील त्यांच्या भूमिकेला सक्रिय पाठिंबा दिला.
जात, समाज, धर्म याच्या पलीकडे जाऊन सर्वांना एक समान वागणूक देत प्रत्येकाच्या

> सर्वांनीच महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. परंतु अजूनही माझी मालकी आणि माझे मालकपण ही प्रवृत्ती काही लोकांतून जात नाही.
> संविधानाने दिलेला राखीव मतदार संघाचा अधिकार देखील एक प्रकारे काढून घेत तेथे डमी उमेदवार दिले जातात आणि आपल्या स्वतःचीच प्रवृत्ती तेथे लादली जाते , हे महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी घडते. मोहोळ मध्ये देखील हे चित्र अनेक वर्षांपासूनचे आहे.

आयुष्यामध्ये पैसा निर्माण करणे ही आजची महत्त्वाची गरज आहे आणि त्यासाठीच माझी उमेदवारी आहे.
मनमानी पद्धतीने सरकारी कार्यालयाचे स्थलांतर करत जनभावनेचा आदर नाकारणे ही संविधान विरोधी कृती आहे. या काही

> सगळ्यांचा स्वाभिमान तुमच्याच अंगणात गहाण ठेवायचा , अनुदान तुमच्याकडे , मोठी कर्ज तुमच्याकडे , कर बुडवेगिरी करून सत्ता संपत्तीचं संकलन देखील तुमच्याकडेच पाहिजे.... सगळं जग तुमच्या अंगणामध्ये आणून ठेवलं तर मग इतरांनी जगायचे कसे ? त्यामुळे मोहोळचा मतदार अनेक वर्षे या संधीची वाट पाहत आहे.

सरकारी सेवा सुविधा आहेत त्या सर्व आपल्या गावात, आपल्या घरात, आपल्या गोठ्यामध्येच आणायच्या राजकीय नेते , कार्यकर्ते सुद्धा त्या गोठ्यातच बांधायचे .सगळ्यांचा स्वाभिमान तुमच्याच अंगणात गहाण ठेवायचा , अनुदान तुमच्याकडे , मोठी कर्ज तुमच्याकडे , कर बुडवेगिरी करून सत्ता संपत्तीचं संकलन देखील तुमच्याकडेच



पाहिजे.... सगळं जग तुमच्या अंगणामध्ये आणून ठेवलं तर मग इतरांनी जगायचे कसे ? त्यामुळे मोहोळचा मतदार अनेक वर्षे या संधीची वाट पाहत आहे.
परिवर्तनासाठी कोणीतरी सक्षमतेने आपल्या पाठीमागे उभे राहावे याची त्याला प्रतीक्षा होती, त्याचा शोध आता संपलाय. ही नांदी यावेळी मूर्त स्वरूप घेईल आणि माझ्या उमेदवारीच्या माध्यमातून हा संघर्ष संपेल आणि मोहोळ मध्ये एका नव्या स्वाभिमानी सूर्याचा उदय होईल हा माझा विश्वास आहे. असेही शेवटी खरे यांनी सांगितले.

# किती घसरलाय राजकारणाचा स्तर ?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** विश्वातल्या बुद्धीमत्तेचा स्तर दिवसेंदिवस आधुनिक शास्त्राच्या अवगत आधाराने वृद्धींगत होत असतानाच महाराष्ट्रातल्या विधानसभेच्या निवडणुकीच्या निमित्ताने राजकीय व्यासपीठावर राजकारणाचा स्तर किती घसरला आहे याचे वास्तव नुकतेच प्रसार माध्यमातून दुपारी तीन च्या सुमारास प्रसिद्ध झालेल्या एका दृश्यप्रणालीचे दर्शन लोकांना होताच याचे आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाही.
याबाबतचे ताजे उदाहरण म्हणजे आज सकाळच्या सुमारास देशाच्या राजकारणातील एक प्रमुख व्यक्तीमत्व मानले जाणारे आणि महाराष्ट्राच्या निवडणुकीचे किंगमेकर शरद पवार यांच्या पत्नी सौ. प्रतिभा पवार आणि त्यांची नात रेवती सुळे या दोघीजणी बारामती येथील प्रसिद्ध असलेल्या टेक्सस्टाईल पार्कमध्ये कांही खरेदी करण्यासाठी गेल्या होत्या. देशाचे सर्वोच्च नेते समजले जोणारे, महाराष्ट्राच्या निवडणूकीचे किंगमेकर आणि सत्ता पालटासाठी वयाचा विचार न करता उन्हात, पावसात प्रचाराचा धडाका लावणारे नेते शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली किंबहुना नर्तृत्वाखोली उभा राहिलेल्या या टेक्सस्टाईल पार्कमध्ये खुद्द त्यांच्या पत्नीलाच प्रवेश नाकारला गेला. स्वतः प्रतिभाताई आणि रेवती सुळे यांनी ज्या गेटवर त्यांची गाडी अडवली. त्या वॉचमनला त्यांनी विचारले तेंव्हा त्या वॉचमनने आम्हाला वरुन आदेश आलेला आहे. म्हणून आपली गाडी सोडता येणार नाही. दोघांचाही कांही मिनिटांचा संवाद होऊन सुद्धा गेट बंदच होते.
राजकारणाचा कित्येक वर्षाचा अनुभव ज्या प्रतिभा पवार यांनी अनुभवला यांना या घटनेनी एक वेगळाच अनुभव आणून दिला. अर्धा तास त्या वॉचमनशी वाद-संवाद होऊन सुद्धा त्यांची गाडी आत जाऊ शकली नाही. सुमारे अध र्यातासाच्या अवधीनंतर त्यांची गाडी आत सोडण्यात आली. महाराष्ट्राच्या राजकारणाचा धुरंदर नेता असलेल्या शरद पवार यांच्यासारख्या महामुत्सद्दी पत्नीला आत सोडण्यासाठी केलेला विरोध हा अत्यंत दुर्दैवी असून महाराष्ट्रातल्या राजकारणाचा स्तर किती खालावलेला आहे याचे मुर्तीमंत प्रतिक या प्रसंगातून समोर आल्याशिवाय राहात नाही.
रक्ताची नाती, स्वतःच्या स्वार्थासाठी जेंव्हा परस्पराशी वैचारिक युद्ध करायला तयार होत असतात तेंव्हा स्वार्थाच्या उतरंड्यापुढे रक्ताच्या नात्याची होणारी अवहेलना ही कोणत्याही राजकारण्याला शोभा देणारी आहे का? असा प्रश्न पडल्याशिवाय राहात नाही.
सगळ्यात वैशिष्ट्य म्हणजे जिथे शरद पवारांचा जन्म झाला, जिथे प्रतिभाताईंनी अनेक सत्तेच्या चढ-उतारावरुन जाण्याचा-येण्याचा अनुभव घेतला त्या प्रतिभाताईंना नातेसंबंधातून आलेला अनुभव अत्यंत किळसवाणा आणि विचित्र आहे असा वाटतो. प्रवेश नाकारला तो कुणी, का, कसा याचे उत्तर मिळणे अवघड असले तरी या टेक्सस्टाईलच्या अध्यक्षा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सौ.सुनेत्राताई पवार या आहेत. यावरुन हा स्तर किती खालावलाय याचे उदाहरण समोर आल्याशिवाय राहात नाही.

» पान १ वरुन


## पवार साहेबांनी नवीन चेहऱ्यास संधी दिली....

निर्णय घेतला होता. त्याप्रमाणे त्यांनी अनिल सावंत यांना उमेदवारी दिली आहे. अनिल सावंत यांच्याकडे काम करण्याची चांगली पद्धत असून यामुळे मतदार संघाचा विकास होण्यास मदत होणार आहे. लोकसभा निवडणुकीत मतदारांनी महायुती शासनाला जागा दाखविल्यानंतर त्यांना आता जाग आली असून त्यांनी मते मिळविण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. महिलांना महिन्याला पंधराशे रुपये देण्यात येत आहेत. मात्र राज्यात महाविकास आघाडीची सत्ता आल्यानंतर महिलांना तीन हजार रुपये देण्यात येतील असे आश्वासन खासदार सुळे यांनी दिले. पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघात खा. पवार साहेब यांना मानणारा मोठा वर्ग आहे. यामुळे पवार यांचा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी मतदारांनी यंदाच्या निवडणुकीत अनिल सावंत यांना विजयी करावे.

## 541 सैनिकांना मतपत्रिका पाठविल्या

**पंढरपूर :** पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघात 541 सैनिक असून त्यांना मतदानाचा हक्क बजाविण्यासाठी प्रशासनाने मतपत्रिका पाठविल्या आहेत.
सोलापूर जिल्ह्यात मतदानाची टक्केवारी कमी असल्याने निवडणूक आयोगाने जिल्ह्याची मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रशासनाने उपाय योजना कराव्यात अशी सूचना केली आहे. यामुळे प्रशासनाने 85 वर्षावरील जेष्ठ नागरिक व दिव्यांग यांना घरबसल्या मतदानाचा अधिकार दिला आहे. तसेच मतदार संघात असलेल्या 541 सैनिकांना मतदानाचा अधिकार मिळावा म्हणून ते या ठिकाणी आपली सेवा बजावत आहेत. त्या ठिकाणी मतपत्रिका पाठविण्यात आल्या आहेत. तसेच पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघात निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी 1128 कर्मचारी काम करत आहेत. त्यांना मतदान करता यावे यासाठी टपाली मतदानाची सोय करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांना मतपत्रिका पाठविण्यात आल्या असून ते मतदान करून मतपत्रिका पाठविणार आहेत. सैनिक व टपाली मतपत्रिका मतमोजणीच्या अगोदर म्हणजे 22 नोव्हेंबरच्या अगोदर प्राप्त होणार आहेत. या मतदार संघात 20 नोव्हेंबर रोजी मतदान घेण्यात येणार असून 23 नोव्हेंबर रोजी मतमोजणी करण्यात येणार आहे.

## धुर्त शक्तीचे आक्रमण रोखण्यासाठी मताधिक्य द्या



**माढा :** माढा तालुक्याची अस्मिता आणि स्वाभिमान भक्कम ठेवण्यासाठी आणि या तालुक्यावर दुष्ट धूर्त आणि लबाड शक्तीचे अतिक्रमण रोखण्यासाठी व या तालुक्यात सुख समाधान आणि वैभव निर्माण झालेले सध्याच्या काळातील अस्तित्व उध्वस्त करण्यासाठी टपलेल्या बाहेरच्या पोकळ, खोटारडा मोठेपणा दाखवणार्या दडपशाही शक्तीला रोखण्यासाठी आपला एकसंघ पणा दाखवून या निवडणुकीमध्ये विक्रमी मताधिक्य द्यावे असे आव्हान माढा विधानसभेचे अपक्ष उमेदवार रणजीत शिंदे यांनी लऊळ येथील जाहीर सभेत बोलताना केले.

## ओमराजे निंबाळकरांची मोदी यांच्यावर टीका

**माढा :** पंतप्रधानांनी अजित पवार यांच्यावर कारवाई करण्याचा इशारा दिला होता. मात्र त्यांनी सरकारला पाठिंबा दिल्यानंतर त्यांना थेट उपमुख्यमंत्री करून अर्थ खाते दिले. ७० हजार कोटींचा घोटाळ्याचा आरोप असलेल्या नेत्याला पंतप्रधान, उपमुख्यमंत्री करीत असतील तर विश्वास कोणावर ठेवायचा? असा सवाल शिवसेना ठाकरे गटाचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी केला.

## उद्याचा भविष्यकाळ उभा करायचा असेल तर महायुतीच्या पाठीमागे मत उभे करा : मा.आ. प्रशांतराव परिचारक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** राज्यात महायुती सरकारने गेल्या दोन वर्षांमध्ये विविध योजनेच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकांचा विकास केला आहे. त्यामध्यामतून आ. शहाजीबापूंनी तालुक्यामध्ये ५ हजार कोटीची विकासकामे पूर्ण केली आहेत. विकासासाठी केंद्रात आणि राज्यात एका विचाराचे सरकार असणे काळजी गरज आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार हे राज्याचे भविष्य आहे यांच्या हातात सत्ता द्यायची का जे भूतकाळातील नेते आहेत जे काही करू शकत नाहीत त्यांच्या हातात सत्ता द्यायची याचा विचार करणारी ही निवडणूक आहे. त्यामुळे जात- पात न पाहता उद्याचा भविष्यकाळ उभा करायचा असेल तर महायुतीच्या पाठीमागे मत उभे करून उर्वरित विकासकामे पूर्ण करण्यासाठी पुन्हा एखादा आ. शहाजीबापू पाटील यांना विजयी करा, असे आवाहन विधान परिषदेचे माजी आ. प्रशांतराव परिचारक यांनी केले. सांगोला विधानसभा महायुतीचे अधिकृत उमेदवार आ. शहाजीबापू पाटील यांच्या प्रचारार्थ भाळवणी त्या पंढरपूर गटातील पंधरा गावांमध्ये गावभेट दौरा आयोजित करण्यात आला होता. त्या प्रचाराच्या अनुषंगाने भाळवणी येथील शिवतीर्थावर विधानपरिषदेचे माजी आ. प्रशांतराव परिचारक यांच्या उपस्थितीत सभा संपन्न झाली. त्याप्रसंगी प्रशांतराव परिचारक बोलत होते.
यावेळी महायुतीतील घटक पक्षातील कार्यकर्त्यांनी आ.शहाजीबापू पाटील यांचे जेसीबीतून फुलांची उधळून करून स्वागत करण्यात आले व हलग्यांच्या निनादात एस.टी स्टँड ते शिवतीर्थ पटांगण इथेपर्यंत रॅली काढण्यात आली.



तसेच प्रशांतराव परिचारक यांनी सभेस उपस्थिती दर्शविल्यामुळे परिचारक समर्थकांचा उत्साह वाढला आहे. या सभेमध्ये माजी ग्रामपंचायत सदस्य नवनाथ शिंदे, आर.पी.आय. सोनवणे गट प्रमोद भोसले, महिंद्र गायकवाड तसेच डॉ. उबाळे यांचे असंख्य कार्यकर्ते यांनी आ. शहाजीबापू पाटील यांना पाठिंबा दिला.

## धनगर समाजाचा वापर केवळ सत्ता मिळविण्यासाठी केला; सावंत यांच्या प्रचार सभेत होळकर यांचा भाजपावर हल्लाबोल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

विधानसभा निवडणुक

**पंढरपूर :** मागील दहा वर्षात धनगरांनी आपली घोंगडी अंथरून भाजपाला सत्तेच्या सिंहासनावर बसविले. सत्ता आल्यानंतर मंत्रिमंडळाच्या पहिले कॅबिनेटमध्ये धनगरांना एसटी आरक्षण देतो म्हणणाऱ्या भाजपने धनगरांना फसविले. इतकेच नाही तर हजार कोटींचे तरतूद केल्याचे गाजर दाखवित एक रुपया सुद्धा दिला नाही. अशाप्रकारे सत्ता मिळवण्यासाठी धनगरांचा वापर करून घेणाऱ्या भाजपच्या पेकाटात काठी हाणायची वेळ आली आहे असे म्हणत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे तेरावे वंशजराजे भूषणसिंह होळकर यांनी भाजपवर हल्लाबोल चढविला. नंदेश्वर (ता.मंगळवेढा) येथे महाविकास आघाडीचे उमेदवार अनिल सावंत यांच्या प्रचारार्थ आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते. यावेळी उमेदवार अनिल सावंत, माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, राष्ट्रवादीचे नेते राहुल शहा, चंद्रशेखर कोंडूभैरी, माजी उपसभापती दादासाहेब गरंडे, माजी सरपंच बाळासाहेब गरंडे,रड्डेचे माजी सरपंच सुरेश कांबळे, धनाजी गडदे, उपसरपंच आनंदा पाटील, किसन करे, काशिलिंग करे, माजी उपसरपंच अंकुश कांबळे, आप्पासाहेब मेटकरी, युवराज बंडगर, अंकुश गरंडे, सुनील कसबे, तुकाराम गरंडे, ज्ञानू गरंडे भाऊसाहेब गरंडे, भाऊसाहेब सलगर हे उपस्थित होते.



यावेळी बोलताना संग्राम माने म्हणाले की, दुष्काळी भागाला आजपर्यंत सर्वच लोकप्रतिनिधींनी फसविले आहे. पण अनिल सावंत यांनी मात्र भैरवनाथ शुगरच्या माध्यमातून इथल्या शेतकऱ्यांच्या उसाला योग्य भाव दिला व बेरोजगारांना इथेच रोजगार उपलब्ध करून दिला आहे. अनिल सावंत हे इतर लोकप्रतिनिधींसारखे फसवा फसवी न करता ते करतात आणि मग बोलतात अशी त्यांच्या कामाची पद्धत आहे आणि असा लोकप्रतिनिधी जर आपल्या मतदारसंघाला मिळाला तरच आपला विकास होणार आहे.
यावेळी बोलताना उमेदवार अनिल सावंत म्हणाले की, कोणत्याही क्षेत्रात असू द्यात आपला वाढप्या ओळखीचा असला की ते काम अगदी सहजासहजी होऊन जाते. त्यामुळे मला तुमचा ओळखीचा वाढप्या समजून सहकार्य करा. मी तुमच्या पदरात नेहमीच वाढता घास टाकेन. आणि मंगळवेढा तालुक्याच्या दुष्काळी भागासहित संपूर्ण मतदारसंघाचा विकास करेन.

## संविधान बदलण्याचे पाप काँग्रेसने केले - नितीन गडकरी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** अलाहाबाद कोर्टाने इंदिरा गांधी यांची निवडणुक रद्द ठरवल्यानंतर काँग्रेसने १९७५ साली संविधान बदलण्याचे पाप केले. आता त्यांचा नातु भाजपावर संविधान बदलणार असल्याचा आरोप करतो आहे. संविधान तर तुम्ही बदलले. काँग्रेसने गरीबी हटावचा नारा दिला आणि निवडणुका जिंकल्या पण त्यांनी आदिवासी, दलित आणि गरीबांची गरीबी न हटवता आपल्या सत्तेचा दुरूपयोग करून स्वतःच्या बगलबच्चांची गरीबी हटवली. त्यामुळेच भारताची प्रगती होऊ शकली नसल्याचा घणाघाती आरोप केंद्रीय वाहतुक मंत्री नितीन गडकरी यांनी अकलूज येथील जाहिर सभेत केला.
भारतीय जनता पार्टीचे माळशिरस तालुका विधानसभेचे उमेदवार राम सातपुते यांच्या प्रचारासाठी अकलूज येथील विजय चौकामध्ये नितीन गडकरी यांची सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी राजकुमार पाटील, संजिवनी पाटील, संस्कृती सातपुते, अॅड. बी. वाय. राऊत, आप्पासाहेब देशमुख, बाजीराव काअकर, के. के. पाटील, बाळासाहेब सरगर, हनुमंत सुळ, शरद मोरे व भाजपाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.
गडकरी पुढे म्हणाले, काँग्रेस जे गत ६० वर्षात करू शकली नाही ते आम्ही पक्त १० वर्षात केले. देशाला स्वयंपुर्ण, आत्मनिर्भर व संरक्षण क्षेत्रात खंबीर केले. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना राबवून संपुर्ण देशातील खेडी शहराला जोडण्याचे काम केले. येणाऱ्या काळात गावे समृध्द आणि संपन्न करण्याची योजना पक्त भाजपाचे सरकारच राबवू शकते. या भागातील टेंभु आणि म्हैसाळ या पाणी उपसा सिंचन योजनांना मी निधी दिल्यानेच या योजना सुरू झाल्या आहेत. या देशातील शेतकरी अन्नदात्या बरोबरच इंधनदाता कसा होईल या दृष्टीने केंद्रीय सरकार पावले उचलत आहे. तरूणांची बेरोजगारी घालवून त्यांच्या हाताला काम देण्यासाठी विविध योजना आखत आहे. सिंचनाला प्राधान्य दिले जात असल्याचे नितीन गडकरी यांनी सांगितले.

## भोजनावळीवर भर हॉटेल धाबे हाऊसफुल



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात चौरंगी लढत होणार आहे. यामुळे मतदारांना खुश करण्यासाठी उमेदवारांनी भोजनावळीवर भर दिला आहे. यामुळे हॉटेल धाबे, हाउसफुल असल्याचे दिसून येत आहे . पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघात महायुती भाजपकडून आमदार समाधान आवताडे, महाविकास आघाडी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून अनिल सावंत, काँग्रेस कडून भगीरथ भालके व मनसेकडून दिलीप धोत्रे निवडणूक रिंगणात उतरले आहेत. यामुळे यंदा चौरंगी लढत होणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. विजय व्हावा म्हणून उमेदवाराकडून वाड्यावर जाऊन जोमाने प्रचार सुरू करण्यात आला आहे.
जाहीर सभा, कॉर्नर सभा, गाठीभेटी घेण्यावर भर देण्यात आला आहे. मोठमोठ्या नेत्यांच्या सभा झाल्या आहेत. मतदानासाठी दोन दिवस शिल्लक राहिले असल्याने आता मतदारांना खुश करण्यासाठी उमेदवारांनी हॉटेल, धाबे येथे मतदारांना भोजन देण्याची व्यवस्था केली आहे. यामुळे हॉटेल, धाबे हाउसफुल असल्याचे दिसून येत आहेत.
पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघात यंदा चौरंगी लढत होणार आहे. यामुळे कोण विजयी होणार याकडे मतदारांचे लक्ष लागले आहे.
मतदारांना मतदान केंद्रापर्यंत आणून मतदान वाढविण्यासाठी उमेदवारांचे पदाधिकारी कार्यकर्ते परिश्रम घेत असल्याचे दिसून येत आहे. जे कार्यकर्ते व मतदार आहेत त्यांना खुष करण्यासाठी जेवणावळी उठत आहेत.

### माढा,मोहोळ आणि पंढरपूर-मंगळवेढा मतदार संघातील उमेदवारांसाठी पवार यांची सभा

# महाराष्ट्रात संदेश गेला पाहिजे पवार यांचा नाद करायचा नाय - खा.शरद पवार

माढा विधानसभा निवडणुकीत मतदारांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या उमेदवाराला प्रचंड मतांनी विजयी करावे व महाराष्ट्रात संदेश पोहोचवावा पवारांचा नाद करायचा नाय असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे संस्थापक अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी केले.
पंढरपूर मंगळवेढा माढा व मोहोळ विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ टेंभुर्णी येथे घेण्यात आलेल्या जाहीर सभेत खासदार शरद पवार बोलत होते. यावेळी तिन्ही मतदार संघाचे उमेदवार पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.
पवार म्हणाले यंदाची निवडणूक अटीतटीची आहे यामुळे मतदारांनी सावध राहून मतदान करावे. पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार अनिल सावंत, माढा विधानसभा मतदार संघातील उमेदवार अभिजीत पाटील व मोहोळ विधानसभा मतदारसंघातील उमेदवार राजू खरे यांना प्रचंड मतांनी विजयी करून महाराष्ट्रभर संदेश पाठवावा पवार यांचा नाद करायचा नाय असे सांगून पवार म्हणाले, सोलापूर जिल्ह्यात माझ्यावर प्रेम करणारे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते आहेत. यामुळे आपण जिल्ह्यात विकास करण्यासाठी प्राधान्य दिलेले आहे. जिल्ह्यातील साखर कारखान्यांना मदत केली आहे. त्यांनी नाव न घेता आमदार बबनदादा शिंदे यांच्यावर टीका केली. त्यांना माढा मतदार संघात



अनेक वेळा उमेदवारी दिली. विजयी झाले मात्र राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर त्यांनी मला साथ देण्याऐवजी महायुतीला साथ दिली. यामुळे पाठीत खंजीर खुपसणाऱ्या व्यक्तीला मतदारांनी धडा शिकवावा असे सांगून पवार म्हणाले, लोकसभा निवडणुकीत सोलापूर व माढा लोकसभा मतदार संघात महाविकास आघाडीच्या उमेदवाराला मतदारांनी विजयी केले आहे. त्याप्रमाणे आता विधानसभा निवडणुकीत विजयी करण्याची जबाबदारी मतदारावर आहे. यामुळे त्यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना विजयी करून काम करण्याची संधी द्यावी असे आवाहन केले.

पंढरी संचार

# महागाई रोखणार कधी?


आज देशात भाज्या, धान्य, कडधान्य, भरड धान्य, औषधे, प्रवास, कपडे, शिक्षण, घरभाडे आदी सारेच महाग होत चालले आहे, झाले आहे. याचा फटका गृहिणींना मोठ्या प्रमाणावर बसतो. भाजीपाला, फळे, खाद्यतेल आणि पेयांच्या कडाडलेल्या किमतीमुळे किरकोळ महागाईने ६ टक्क्यांची सहिष्णुता पातळी ओलांडली आहे. बहुतेक वेळा दुकानदार मंडळी साठेबाजी करून धान्याची कृत्रिम टंचाई निर्माण करतात आणि शेतकऱ्यांना व ग्राहकांना वेठीस धरतात. सरकारने या भाववाढीवर आपला अंकुश ठेवला तरच सामान्य जनतेला दिलासा मिळेल. पण तसे काही होणार नाही कारण सरकार सध्या इलेक्शन मोडवर आहे. अन्नधान्याच्या किमतीत वाढ झाल्याने गत ऑक्टोबरमध्ये किरकोळ महागाईचा दर ६.२१ टक्क्यांच्या चिंताजनक पातळीवर गेला. सध्या बाजारात भाज्या, टोमॅटो, लसूण, कांदा, बटाटा, खाद्यतेलाचे भाव कडाडले आहेत. महागाईचा मार सहन करणाऱ्या जनतेला आता आपल्या प्रश्नांची जाण कुणाला आहे, कुणाला नाही याचा सारासार विचार करून २० नोव्हेंबरला आपला मतदानाचा हक्क बजावावा लागणार आहे. सध्या राजकारणी मंडळी 'बटेंगे तो कटेंगे', 'एक है तो सेफ है'च्या कैफात मग्न आहे. खाद्यान्नांच्या किमतीतील वाढीने ऑक्टोबरमध्ये किरकोळ महागाईदर ६.२१ टक्क्यांच्या चिंताजनक पातळीवर गेल्याचे मंगळवारी अधिकृत आकडेवारीद्वारा स्पष्ट करण्यात आले. या दराने १४ महिन्यांचा उच्चांक नोंदवत रिझर्व्ह बँकेसाठी सहनशील सहा टक्क्यांच्या सर्वोच्च पातळीला छेद मिळाल्याने बँकांच्या व्याजदरातील कपातही लांबणीवर जाणार असे दिसते. सर्वसामान्यांच्या रोजच्या अन्नाचा महत्त्वाचा भाग असणाऱ्या भाजीपाला आणि खाद्य वस्तूंचे कडाडलेले दर हे महागाईवाढीस कारणीभूत ठरले असून याचे कारण सप्टेंबरमध्ये किरकोळ महागाई दराने नऊ महिन्यांच्या उच्चांकी साडेपाच टक्क्यांची पातळी गाठली होती. ऑक्टोबर २०२३ मध्ये ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित हा महागाई दर ४.८७ टक्के होता. मागच्या महिन्यात लांबलेल्या पावसामुळे टोमॅटोसह भाजीपाला व कृषी-जिनसांच्या कडाडलेल्या किमतीमुळे खाद्यान्न महागाईचा भडका उडाला. सध्या बाजारात कांदा आणि लसणाचा तुटवडा निर्माण झाला आहे. कांदा ८० ते १०० रुपये किलो तर लसूण ४०० रुपये किलोवर गेला आहे. जेवणाला चविष्ट बनवणारे हे दोन महत्त्वाचे जिन्नस गायब झाल्याने सर्वसामान्यांच्या जिभेची चवच हरवली आहे. कांदा आणि लसणाच्या तुटवड्यामुळे त्यांच्या किमती वाढल्या आहेत. ऐन निवडणुकीच्या तोंडावर हा प्रकार घडल्याने राजकारणी मंडळी धास्तावली आहे. कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये कांदा व लसणाची आवक रोडावल्याने तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे पुढील महिनाभर कांद्याचे आणि तीन-चार महिने लसणाचे भाव चढेच राहण्याची शक्यता आहे. शेतकऱ्याकडील उन्हाळी कांदा आणि लसूण संपला आहे. राज्याबाहेरून होणारी लसणाची आवक थंडावली आहे. त्यामुळे रबी हंगामातील नवीन लसूण बाजारात येईपर्यंत लसणाचे भाव आवाक्यात येणार नाहीत. लसणाचा हंगाम अखेरच्या टप्प्यात असल्याने बाजारात तुटवडा निर्माण झाला आहे. लसणाची रबी हंगामात लागवड केली जाते. लसणाची काढणी फेब्रुवारीपासून सुरु होईल. त्यामुळे पुढील तीन-चार महिने लसणाचे दर भाव खाणार. खरीप कांद्याची काढणी सुरू असतानाच जोरदार पाऊस झाल्यामुळे कांदा सडला. त्यामुळे खरीप कांद्याच्या उत्पादनात मोठी घट झाली. बाजारात कांद्याचा तुटवडा असतानाच बांगलादेशने कांद्यावर लागू केलेले ५० टक्के आयात शुल्क १५ जानेवारीपर्यंत शून्य टक्के केले आहे. त्यामुळे बांगलादेशला निर्यात वाढली आहे. याचा परिणाम कांद्याच्या दरावर झाला. हे दर ८० ते १०० रुपयांवर गेले. खरीप हंगामातील ओला कांदा ६० रुपये दराने विकला जात आहे. दिवाळीनिमित्त नाशिक परिसरात कांद्याची खरेदी-विक्री आठवडाभर बंद होती. त्यामुळेही कांद्याचा तुटवडा निर्माण झाला. कांदा आणि लसणाने ऐन निवडणुकीत सरकारचे टेन्शन वाढवले आहे. कापूस, सोयाबीन दराचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. लोकसभा निवडणुकीदरम्यान कापूस, सोयाबीनला हमीभावापेक्षा कमी दर मिळाल्याने शेतकऱ्यांच्या रोषाचा फटका महायुतीला बसला होता. यावेळी तसे काही होऊ नये म्हणून राज्य सरकारने काही उपाययोजना केल्या आहेत पण त्यामुळे शेतक-यांना दिलासा मिळू शकला नाही. सोयाबीनचे दर कोसळल्याने होत असलेल्या नुकसानीचा मुद्दा निवडणुकीच्या रणधुमाळीत प्रभावी ठरणार असे दिसते. गत हंगामात नुकसान झालेल्या कापूस, सोयाबीन उत्पादक शेतक-यांना पाच हजार रुपये प्रति हेक्टर असे दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रत्येकी ५ हजार रुपये अनुदान देण्याचा निर्णय सरकारने घेतला. त्याचा लाभ शेतकऱ्यांना मिळाला हे खरे असले तरी यंदा सोयाबीनचा हंगाम सुरू होण्याआधी सोयाबीनचे भाव पडले आहेत. केंद्र सरकारने सप्टेंबर महिन्यात खाद्यतेलावरील आयात शुल्क २० टक्क्यांनी वाढविण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे सोयाबीनला चांगला भाव मिळेल अशी अपेक्षा होती, परंतु बाजारातील विपरित परिस्थितीमुळे सोयाबीनचे भाव हमीदराच्या पातळीपर्यंतही पोहोचू शकले नाहीत. शेतमालाचे भाव कोसळल्याचे पाहून सरकारने त्याची दखल घेत दिलासादायक घोषणा करताना कापूस, सोयाबीनला हमीभावापेक्षा कमी दर मिळाल्यास फरकाची रक्कम सरकार देईल असे म्हटले आहे. तरीसुद्धा कापूस, सोयाबीन उत्पादकांची अडवणूक सुरूच आहे. विधानसभा निवडणुकीचा प्रचार भावनिक मुद्यावर नेण्याचे सर्वतोपरी प्रयत्न प्रमुख पक्षांची नेतेमंडळी करीत आहे. ओबीसी, मराठ्यांना परस्परांमध्ये झुंजवून जाती-धर्माचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष उल्लेख करून मतांचे ध्रुवीकरण करण्याचे प्रयत्न होत आहेत. त्यामुळे ही निवडणूक राज्यातील नागरिकांना भेडसावणाऱ्या मूळ मुद्यांपासून भरकटली आहे. निवडणूक प्रचाराचा स्तरही पार घसरला आहे. यंदाच्या निवडणुकीचा प्रचार फारसा रंगलेला नाही. याचे मुख्य कारण म्हणजे राज्यातील ना बेरोजगारी कमी झाली, ना महागाई नियंत्रणात आली. लाडकी बहीण योजनेची रक्कम वाढविल्याने बेरोजगारी कमी होणार नाही अथवा महागाई नियंत्रणात येणार नाही ही काळ्या दगडावरची रेघ आहे. ■

> मनरेगा ग्रामीण भागातील नागरिकांना उत्पन्न आणि उदरनिर्वाहाला चालना देणारे सक्षम कल्याणकारी माध्यम राहिले आहे. परंतु रोजगाराच्या शोधात असलेल्या लोकांसाठी हा शेवटचा पर्याय असावा. गेल्या काही महिन्यांत त्याची मागणी कमी झाली पण ती कोरोना काळापूर्वीच्या स्तरापेक्षा अधिक आहे. तरतुदीत सातत्याने होणारी वाढ आणि वाढता सहभाग यावरुन आपल्या देशाची अर्थव्यवस्था ही पुरेशा प्रमाणात पर्यायी लाभदायी रोजगार निर्माण करू शकत नसल्याचे दिसून येते आणि ही बाब धोरणकर्त्यांसाठी चिंतेची आहे.

# 'मनरेगाची' चिंता

**पनवनाथ वारे, कृषी अभ्यासक**

देशात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) लागू होऊन सुमारे १८ वर्षे झाली. ग्रामीण अर्थव्यवस्थेवरच्या त्याच्या सकारात्मक परिणामाचे आकलन वेळोवेळी झालेल्या अभ्यासातून निष्पन्न झाले आहे. ही योजना कोरोना काळात आणि समाजातील सर्वात वंचित घटकांसाठी अत्यंत महत्त्वाची व उपयुक्त ठरली आहे. आता 'लिबटेक'ने अलिकडेच या योजनेच्या कामगिरीबाबत मांडलेल्या विश्लेषणानंतर 'मनरेगा'वर पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. यात म्हटले, योजनेनुसार रोजगारांत २०२३-२४ च्या पहिल्या सहामाहीच्या तुलनेत २०२४-२५ च्या पहिल्या सहामाहीत १६ टक्के घट झाली आहे. या योजनेत सहभागी होणाऱ्या कामगारांची संख्या ही मागील वर्षांच्या तुलनेत आठ टक्के घटली आहे. यादरम्यान नोंदणीकृत कामगारांच्या यादीतील नावे ३९ लाखांनी कमी झाल्याचे निदर्शनास आले आहे. या अहवालात पेमेंट प्रणाली (एबीपीएस) मधील अडथळ्यांचा देखील उल्लेख केला आहे. त्यात म्हटले आहे की, एकुण कामगारांपैकी २४.७ टक्के कामगारांना 'एबीपीएस'च्या माध्यमातून मजुरी मिळत नाही. परंतु ग्रामीण विकास मंत्रालयानुसार, योजनेतील कामगारांच्या कामाचे एकूण दिवस निश्चित केलेले नसतात. कारण योजनेनुसार कामाचे दिवस ठरलेले असतात आणि चालू आर्थिक वर्षातही काम सुरू आहे. त्यांच्या मते, २००६-०७ पासून २०१३-२०१४ पर्यंत केवळ १६६० कामगार दिवस झाले तर २०१४-१५ पासून २०२४-२५ पर्यंत २९२३ कामगार दिवस झाले. यावरून दहा वर्षांत खूपच कमी रोजगार वृद्धी झाली आहे. देशातील सक्रिय ९९.३ टक्के कामगारांच्या 'आधार'ला देखील ही योजना जोडली गेली. यात अनेक लाभार्थ्यांना चांगल्या रितीने पेमेंट मिळाले आणि यात विलंबाचे प्रमाणही कमी राहिले आहे.




श्रमशक्ती सर्वेक्षणाच्या आकडेवारीनुसार, जुलै ते सप्टेंबर २०२३ आणि एप्रिल ते जून २०२४ या काळात ग्रामीण भागातील हंगामी मजुरांच्या रोजंदारीतील उत्पन्नात ७.७ टक्क्यांनी वाढ झाली. त्याचे श्रेय अर्थातच सरकारच्या 'मनरेगा' सारख्या योजनांना द्यावे लागेल. २०२४-२५ या काळात किमान सरासरी वेतन दरांत ७ टक्के वाढ नोंदविली गेली. २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात या योजनेसाठी ८६ हजार कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आणि ती आतापर्यंतची सर्वाधिक तरतूद आहे. मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत ही तरतूद ४३.३ टक्के अधिक आहे. परंतु २०२३-२४ मधील वास्तविक खर्चाच्या तुलनेत ही तरतूद कमीच आहे. या आर्थिक वर्षात योजनेनुसार १.०५ लाख कोटी रुपये खर्च झाले. अर्थात योजनेला मागणी राहत असेल तर त्यानुसार तरतुदीत वाढ करता येऊ शकते.

मनरेगा ग्रामीण भागातील नागरिकांना उत्पन्न आणि उदरनिर्वाहाला चालना देणारे सक्षम कल्याणकारी माध्यम राहिले आहे. परंतु रोजगाराच्या शोधात असलेल्या लोकांसाठी हा शेवटचा पर्याय असावा, असे मानले जाते. गेल्या काही महिन्यांत त्याची मागणी कमी झाली पण आजही ती कोरोना काळापूर्वीच्या स्तरापेक्षा अधिक आहे. या योजनेसाठीच्या तरतुदीत सातत्याने होणारी वाढ आणि योजनेतील वाढता सहभाग यावरुन आपल्या देशाची अर्थव्यवस्था ही पुरेशा प्रमाणात पर्यायी लाभदायी रोजगार निर्माण करू शकत नसल्याचे दिसून येते आणि ही बाब धोरणकर्त्यांसाठी चिंतेची आहे. कृषी क्षेत्रातील मनुष्यबळाचे प्रमाण गेल्या काही वर्षांत वाढले आहे आणि त्यात घट होऊनही कोरोनापूर्वीच्या स्थितीवर (२०१८-१९मधील ४२.५ टक्के) वर आलेले नाही. वास्तविक २०१८-१९ मधील आकडा देखील अधिक होता आणि तो मनुष्यबळाच्या स्थितीचे विदारक चित्र दर्शविणारा होता. रोजगार हमी योजना ग्रामीण कुटुंबाला पुरेशा प्रमाणात सुरक्षा प्रदान करते, पण एवढ्या कुटुंबांना मनरेगासारख्या योजनांवर सतत अवलंबून का राहवे लागत आहे? यावर चर्चा करायला हवी. अशा प्रकारच्या योजनेवरचे अवलंबित्व कमी करण्यासाठी काय करायला हवे, यावरही चर्चा हवी. कमी कुशल कामगारांची गरज असेल्या उद्योगांनी मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करणे हाच यावरचा तोडगा. या आधारावर कृषी क्षेत्रातून लोक बाहेर पडतील आणि अन्य क्षेत्राकडे वळतील. वास्तविक गेल्या अनेक दशकांपासून आपला देश अशा प्रकारचे प्रयत्न करू शकलेला नाही.

भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास जगातील सर्व देशांपेक्षा झपाट्याने आणि लक्षणीयरित्या होत असल्याचे ग्राह्य मानले तर त्यातुलनेत देशात रोजगारवाढ का होत नाहीये, हा कळीचा प्रश्न आहे. अनेक अर्थतज्ज्ञ भारताच्या विकासाचे वर्णन रोजगारविहीन विकास असेही करत असतात. बेरोजगारीची आकडेवारी पाहिल्यास या अर्थतज्ज्ञांची हेटाळणी करता येणार नाही. रोजगारवाढ करण्यासाठी कौशल्य विकास करणे गरजेचे आहे. आज गावाखेड्यातील मुलांना इंटरनेट तंत्रज्ञानामुळे जगाची कवाडे खुली झाली आहेत. त्यांच्या आकांक्षा वाढल्या आहेत. त्यांना मनरेगामध्ये मिळणाऱ्या रोजगाराचे आकर्षण असेल का? रोजगारहमीपेक्षा त्यांना स्थिर, शाश्वत, चांगले वेतन देणारे आकर्षक रोजगार हवे आहेत. त्यासाठीचे कौशल्य देणारे शिक्षण-प्रशिक्षण हवे आहे. पुढील २५ वर्षांसाठीची योजना आखताना केवळ अर्थव्यवस्थेचे आकारमान वाढवून चालणार नाही, तर रोजगारक्षमता आणि कौशल्य विकसन वाढणे, त्यातून बेरोजगारीचा आलेख नीचांकी पातळीवर आणणे, गरीबीचे प्रमाण घटणे आणि सामाजिक विषमता कमी होणे गरजेचे आहे. जर्मनी-जपानला आपण मागे टाकल्याने आपण विकसित झालो असे मानून चालणार नाही. भारताला आपले दरडोई उत्पन्न वाढवणे, महागाईचा दर कमी करणे, सामाजिक विषमता कमी होणे, गरीबीचे उच्चाटन, शिक्षण-कौशल्य-आरोग्य या तिन्ही क्षेत्रांमध्ये भरीव प्रगती करणे, महिलांचा आर्थिक विकासातील सहभाग आणि योगदान वाढवणे यांसह अन्य अनेक गोष्टींची गरज आहे.

या सर्व विवेचनाचा अर्थ मनरेगा योजनेच्या उद्दिष्ट व उपयुक्ततेवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्याचा बिलकूल नाही. देशातील गरीब व बेरोजगार कुटुंबे आपल्या उदरनिर्वाहासाठी या योजनेचा लाभ घेत आहेत. अशा कमकुवत उत्पन्न गटातील लोकांना त्यांच्याच ग्रामपंचायतीत रोजगार दिला जातो, त्यामुळे स्थलांतराचा प्रश्नही बऱ्याच अंशी टळला आहे. मनरेगाच्या माध्यमातून गावात समृद्धी निर्माण करणे शक्य आहे. पण प्रश्न आहे तो बदलत्या आर्थिक-सामाजिक वातावरणाचा आणि उंचावत चाललेल्या आशाआकांक्षांचा, गरजांचा...! त्यादृष्टीने धोरणकर्त्यांनी विचार करावा इतकेच !

'संपर्क' संस्थेतर्फे प्रकाशित एका लेखातील माहितीनुसार, गेल्या पाच वर्षांत राज्यातील एकूण ग्रामीण कुटुंबसंख्येच्या जास्तीत जास्त २० टक्के कुटुंबांनी मनरेगावर काम केले आहे. याच काळात प्रत्येक कुटुंबाला सरासरी प्रती वर्षी ३७ ते ४७ एवढेच दिवस काम मिळाले आहे. म्हणजेच एका वर्षात या कुटुंबांनी सरासरी ८,९४५ ते १२,२६७ एवढी रक्कम मजुरीतून कमावलेली आहे. ही समाधानकारक आणि पुरेशी आहे असे मानायचे का? याला 'मनरेगा'चे यश म्हणायचे का? ■

## गुड मॉर्निंग

दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

### पंचांग

**सोमवार, दिनांक १८ नोव्हेंबर २०२४**
कार्तिक कृ. ३, मृगशीर्ष, श्री शके १९४६,
विक्रम संवत् २०८१, अनलनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू
संकष्ट चतुर्थी, चंद्रोदय रात्री : ८.१७
नक्षत्र : मृगशीर्ष, योग : सिद्ध, करण : वणिज बव
**सूर्योदय :** स.०६.२७ **सूर्यास्त :** सायं. ०५.२९ वा.
राहू काळ : दसकाळी : ७:३० ते ९:००

### दिनविशेष

▶१७७२: थोरले माधवराव पेशवा यांचे निधन. त्यांच्या पत्नी रमाबाई सती गेल्या. ▶१८८२: अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी लिहिलेल्या संगीत सौभद्रचा पहिला प्रयोग पुण्यात पूर्णानंद नाट्य मंदिरात सादर. ▶१९०१: 'चित्रपती' व्ही. शांताराम यांचा जन्मदिन. ▶१९०४: महाराष्ट्रात घराघरांत आढळणाऱ्या ल. रा. पांगारकर संकलित भक्तिमार्गप्रदीची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली. ▶१९२८: 'पंजाब केसरी' लाला लजपतराय यांचा स्मृतिदिन. ▶१९५२: सरदार विठ्ठलराव लक्ष्मणराव ठुबे यांचे निधन. महाराष्ट्रातील एक प्रमुख कॉन्ट्रॅक्टर म्हणून ते ओळखले जात. ▶१९६२: शिवाजी विद्यापीठ स्थापना. ▶१९६७: आसामातील प्रसिद्ध निसर्गकवी रघुनाथ चौधरी यांचे निधन.निसर्गातील पक्षांचे त्यांना विशेष वेड असल्याने 'विहंगकवी' म्हणून ते ओळखले जात. ▶१९७०: चंद्रावर आठ चाकाची ल्युनो खोद ही गाडी फिरू लागली. ▶१९९६: ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, स्वातंत्र्यसैनिक, भारतातील कम्युनिस्ट चळवळीचे प्रारंभापासूनचे नेते कॉमेड श्रीनिवास गणेश सरदेसाई यांचे निधन. ▶१९९९: ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक रामसिंह परदेशी यांचे निधन.

### राशीभविष्य

▲ **मेष** : तणाव कमी होईल. ▲ **वृषभ** : कामात विलंब होईल. ▲ **मिथुन** : उत्साह कमी होईल. ▲ **कर्क** : आनंददायक दिवस. ▲ **सिंह** : गृहसौख्य लाभेल. ▲ **कन्या** : योग्य व्यक्तींशी संपर्क होईल. ▲ **तुळ** : वसुलीस अनुकूल दिवस. ▲ **वृश्चिक** : महत्वाची कामे होतील. ▲ **धनु** : जबाबदाऱ्या वाढतील. ▲ **मकर** : उलाढाल वाढेल. ▲ **कुंभ** : अपेक्षित बातमी कळेल. ▲ **मीन** : कामात प्रगती होईल.

### चिंतन

जीवनाचा अर्थ समजून घेण्यासाठी खरे शिक्षक उत्सुक असतात. खरा कलावंत एकवेळ उपाशी राहील. पण आपले कलानिर्मितीचे कार्य मध्येच अपुरे सोडणार नाही. खऱ्या शिक्षकाचे, गुरूचेही तसेच असावयास हवे. शिकवणे, विद्या देणे हे गुरूच्या बाबतीत तंत्र नसून त्याच्या जीवनाचा तो मंत्र व्हायला हवा. – जे. कृष्णमूर्ती

### व्यक्तीविशेष

**क्रांतिकारक लाला लजपतराय**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक थोर क्रांतिकारक लाला लजपतराय यांचा जन्म पंजाबमधील लुधियाना जिल्ह्यातील धुंढिके गावी दि. २८ जानेवारी १८६५ रोजी झाला. लाहोरमध्ये वकिली करत असतानाच ते 'आर्य समाजवादी' झाले. बंगालची फाळणी, कर्झनशाही आणि पंजाबच्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावरील आंदोलनात ते अग्रभागी होते. या साऱ्यामुळे त्यांना 'पंजाबचा सिंह' म्हणण्यात येऊ लागले. जहाल मनोवृत्तीचा हा सिंह पुढे लाला हरदयाळ यांच्यासह इंग्लंडला गेला. पुढे गोपाळ कृष्ण गोखले यांच्या 'भारत सेवक समाजाच्या' धर्तीवर त्यांनी पंजाबमध्ये 'पीपल्स सोसायटी' काढली. १९२५च्या हिंदू महासभेच्या पहिल्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. नोव्हेंबर १९२८ मध्ये सायमन कमिशन विरोधी झालेल्या आंदोलनाचे नेतृत्व लालाजींनी केले. त्यावेळी झालेल्या मारहाणीमुळे ते आजारी पडले. त्यातच १८ नोव्हेंबर १९२८ मध्ये त्यांचे निधन झाले. त्याचा बदला सॉंडर्सची हत्या करून भगतसिंग आदी क्रांतिकारकांनी घेतला.

### बोधकथा

**सुडाने जिंकता येत नाही**

विजय आणि अजय दोघे मित्र एकाच वर्गात शिकत होते. वर्गात दर वर्षीप्रमाणे क्रीडादिनाच्या निमत्ताने वेगवेगळ्या स्पर्धा झाल्या. या स्पर्धांमध्ये विजय आणि अजय दोघेही धावण्याच्या अंतिम स्पर्धेत पोहोचले. विजयने अजयवर मात करून धावण्याची स्पर्धा जिंकली. यामुळे अजयला राग आला. तो विजयचा हेवा करू लागला. त्याच्या मनात सुडाची भावना निर्माण होऊन आपण विजयचा पराभव नक्कीच करू असा विचार त्याच्या मनात घोळू लागला. त्यामुळे त्याचे अजयबरोबरीचे वागणेही बदलले. तो अजयचा सतत रागराग करू लागला. त्याच्याशी सतत भांडू लागला. आपल्या मित्राला अचानक काय झाले हे अजयला काही केल्या समजेना. अजयला मनातल्या मनात विजयच्या वागण्याबद्दल खूप वाईट वाटत होते. पण मैत्रीसाठी तो अजयचे वागणे सहन करत होता. एकदा शाळा सुटल्यानंतर विजय नेहमीप्रमाणे आपली सायकल काढून निघाला. अजयदेखील त्याच्या पाठीमागून त्याच्या सोबत जाण्यासाठी निघाला पण विजयला काही त्याच्या सोबत जायचे नव्हते. तो वेगाने पायंडल मारत धावू लागला. अजयला चुकवण्याच्या नादात समोरून येणाऱ्या गाडीकडे त्याचे लक्षच गेले नाही आणि तो धाडकन त्यागाडीवर जाऊन आदळला. विजयच्या पायाला मोठी दुखापत झाली. (पूर्वार्ध)

### जिज्ञासा

**मधमाशांवरचे संशोधन**

मधमाशा दिवसभर या फुलावरून त्या फुलावर फिरत मध जमा करत असतात. आपल्या एका उड्डाणात त्या ५० ते १०० फुलांवर जातात. कोणत्या फुलाचे परागकण मधासाठी उपयुक्त आहे हे फुलांजवळ जाऊन त्यांच्या सुगंधावरून मधमाशा बरोबर ओळखतात. त्यांची ही क्रिया दिवसभर सतत सुरू असते. त्यांच्या या धावपळीवर अलिकडेच एक संशोधन करण्यात आले आहे. या संशोधनातून शास्त्रज्ञांनी जाणले आहे की, मधमाशांची कार्यकुशलता सकाळच्या वेळी अधिक असते. यावेळी त्या फुलांची ओळख अधिक चांगल्या पद्धतीने करू शकतात. फुलांचे परगकण एकत्र करण्यात यावेळी त्यांना विशेष त्रासही होत नाही.

बिहेविचरल इकॉलॉजी ॲण्ड सोशिओबायोलॉजी मध्ये याबाबतची माहिती प्रकाशित झाली आहे. सकाळचीच वेळ मधमाशांना मध जमा करण्यासाठी योग्य असतो, असे त्यात म्हटले आहे. (पूर्वार्ध)

### सामान्यज्ञान

**परिणाम भरती-ओहोटीचे**

हे प्रवाह शीत आणि उष्ण असतात. हे प्रवाह किनाऱ्यालगत वाहत असतील तर ते किनाऱ्यालगतच्या प्रदेशांच्या हवामानावर आणि लोकजीवनावर बराच परिणाम करतात. लाटांमुळे आणि समुद्र पवाहामुळे समुद्राच्या पाण्यामुळे सतत अभिसरण होत राहते. समुद्राच्या तळाजवळचे थंड आणि खनिजयुक्त पाणी यामुळे उपसले जाते. वातावरणातील उष्णता ऊर्जेचा वापर हे थंड पाणी गरम करण्यासाठी होतो. परिणामी, वातावरणाचे तापमान खूप वाढण्यापासून रोखले जाते. लाटा जेवढ्या मोठ्या तेवढे अभिसरीत होणाऱ्या पाण्याची खोली जास्त (क्रमशः)

### सोडवा सुडोकू

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक ५०२**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | | | 4 |
| | 1 | 4 | |
| | 4 | 1 | |
| 4 | | | 1 |

**क्रमांक ५०१ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | 3 | 4 | 2 |
| 4 | 2 | 1 | 3 |
| 2 | 1 | 3 | 4 |
| 3 | 4 | 2 | 1 |

### हास्यविनोद



**मुलगी** : माझ्याकडे असं काय बघतो आहेस? तुला बहिण वगैरे आहे की नाही घरी? **मुलगा** : आहे की. म्हणूनच बघतोय ! मुलगी : म्हणजे? **मुलगा** : माझी बहिणी म्हणाली, 'दादा मला एक वहिनी आण...'

बायकोच्या सततच्या बडबडीमुळे चंदू जाम वैतागला होता.
**चंदू** : तू जर पाच मिनिटं गप्प बसलीस ना तर मी तुला पाचशे रूपये देईन.चंदूची बायको गप्प बसली. जेमतेम दोन मिनिटांनंतर तिने चंदूला विचारलं, अहो, जरा घड्याळ बघा ना, पाच मिनिटं झाली का ते ?'

### महिलायन

**फंडे केसांच्या आरोग्याचे**

वाढतं प्रदूषण, फॅशनचं बोकाळलेलं फॅड, वाढता तणाव, सातत्याने हेअरस्टाईल बदलणं आणि इतर अनेक गोष्टींमुळे केस गळणं, ते अकाली पांढरे होणं अशा अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यापासून बचाव करण्यासाठी काही महत्त्वाचे फंडे जाणून घ्यायला हवेत.

आकर्षक व्यक्तिमत्त्वांमध्ये कपड्यांइतकंच केसांचंही महत्त्व असतं, हे आपल्याला माहितीच आहे. अनेकदा आपला लूक आकर्षक करण्यासाठी आपण केसांवर नाना प्रकारचे प्रयोग करत असतो. पण त्यातून केस गळणं, ते पांढरे होणं यासारख्या अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. आता हवामानातही दिवसेंदिवस बदल होत आहे. त्याचाही आपल्या केसांवर परिणाम होतो. केसांविषयी समस्या निर्माण व्हायला अनेक कारणं आहेत. केसांची योग्य स्वच्छता न ठेवणं किंवा त्याबद्दल बेफिकीरी बाळगणं हे सर्वात महत्त्वाचं कारण आहे. एखाद्या कारणाने ट्रॉमा किंवा तणावात राहणं, केसांमध्ये कोणत्या तरी गोष्टीचं इन्फेक्शन होणं, औषधांचे साईट इफेक्ट अशा कारणांमुळेही केसांच्या समस्या निर्माण होऊ शकतात. वर नमूद केलेल्या कारणांमुळे केसांमध्ये डॅंड्रफ निर्माण होणं, खाज निर्माण होणं, केस गळणं, टक्कल पडायला सुरुवात होणं, केस शुष्क होणं अशा अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होतात. आज महानरांमधील अनेक तरुण-तरुणी अशा समस्यांनी ग्रस्त आहेत. वर दिलेल्या कारणांशिवाय महानगरांमधील वाढतं प्रदूषण, व्यस्त जीवनशैली, कामाच्या बोज्याने निर्माण झालेला तणाव, केसांची देखभाल करण्यासाठी पुरेसा वेळ न मिळणं, हवामानात होणारे बदल, (क्रमशः)

### बालांगण

**दोस्ती संगणकाशी**

शॉर्ट कीज वापर जेवढा अधिक कराल तेवढे तुमचे काम सोपे होईल. कामाच्या ठिकाणीही तुमच्या शॉर्टकीजच्या वापरावरून तुमची संगणकावर असणारी कमांड लक्षात येऊन त्याची योग्य नोंद घेतली जाईल. यासाठी साध्या-साध्या शॉर्टकीज माहित असणं आवश्यक आहे. उदाहरणार्थ, जर तुम्हाला एखाद्या फाईल अथवा फोल्डरचे नाव बदलायचे आहे. तर त्यासाठी राईट क्लिक करून रिनेम वर क्लिक करण्याची गरज नाही. त्यासाठी एफ२ (F2) ही की वापरता येते. डेस्कटॉपवर अथवा वेबपेजवर रिफ्रेश करण्यासाठी एफ५ (F5) ही की वापरता येते. सर्च करण्यासाठी एफ थ्री (F3) वापरता येते.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com

## संजय राऊतांची राज ठाकरेंवर टीका

# "महाराष्ट्राच्या दुश्मनांचे बूट चाटू नका"

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते, खासदार संजय राऊत यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशावरून राज ठाकरे हे सुनील राऊत यांच्याविरोधात सभा घेत आहेत. ज्यांनी शिवसेनेच्या पाठीत खंजीर खुपसला त्या नरेंद्र मोदी, अमित शाहांचे बूट राज ठाकरे चाटत आहेत, असा घणाघात संजय राऊत यांनी केलां. ठाकरे गटाचे विक्रोळी विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार सुनील राऊत यांच्यासाठी घेतलेल्या प्रचारसभेत ते बोलत होते.



राज ठाकरे विक्रोळीत दोन वेळा येऊन गेले. देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशाने राज ठाकरे येथे आले. लोकशाहीत त्यांना अधिकार आहे. मात्र महाराष्ट्रात अनेक प्रश्न असताना राज ठाकरे बोलले कशावर बोलले तर माझ्यावर. राज ठाकरे यांना मी स्वप्नात दिसतो. नरेंद्र मोदींना, अमित शाहांना स्वप्नात संजय राऊत दिसतात. राज ठाकरे, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे यांना माझ्या नावाने झोप लागत नाही. ही निष्ठावंतांची ताकद आहे, असं संजय राऊत म्हणाले.

संजय राऊत यांनी म्हटलं म्हणाले की, नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्र भिकारी केला आहे. त्या मोदींचे आपण पाय चाटत आहात. बाळासाहेब ठाकरे यांनी नेमलेल्या संपादकाला तुम्ही भिकारडा म्हणताय, हे तुमचं बाळासाहेबांवरचं प्रेम. तुमची पोटदुखी, मळमळ आहे ती तुम्ही बाहेर काढली. तुम्ही ठाकरे आहात तर ठाकरेंसारखे वागा. महाराष्ट्राच्या दुश्मनांचे बुट चाटू नका, अशी माझी नम्र विनंती आहे, असं संजय राऊत यांनी म्हटलं.

राज ठाकरेंनी त्यांच्या सभेत माझ्यासाठी रिकामी खुर्ची ठेवली. मग मी ठरवलं आपण त्यांच्यासाठी खाट ठेऊया. कारण २३ तारखेला आपण त्यांची खाट टाकणारचं आहोत. आम्ही बाळासाहेबांची कडवट निष्ठावंत आहे. आम्ही आमची निष्ठा, इमान विकलं नाही. आम्हीला ईडी घेऊन गेली म्हणून घाबरलो नाही. तुम्हाला ईडीने एकदा बोलवलं दोन वर्ष कोमात गेलात, असा टोला संजय राऊत यांनी राज ठाकरे यांना लगावला.

दरम्यान, उद्धव ठाकरेंनी संघर्ष सुरू केला. ज्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना नरेंद्र मोदी-अमित शाह या २ व्यापाऱ्यांनी तोडली, फोडली, विकली त्यांच्याविषयी राज ठाकरेंना ममत्व असेल, प्रेम असेल तर आपण महाराष्ट्राच्या दुश्मनांची दलाली करताय. जो महाराष्ट्र विकायला काढला आहे गौतम अदानींना त्यावर राज ठाकरे बोलत नाहीत. मराठी माणसाला देशोधडीला लावण्याच्या सुपाऱ्या घेतल्यात त्यावर राज ठाकरे बोलत नाहीत. मराठी माणसाला तरुणाला बेरोजगार केले जातेय, नोकऱ्या गुजरातला पळवल्या जातायेत त्यावर बोलत नाही. पण देवेंद्र फडणवीस राज्याचा मुख्यमंत्री झाला पाहिजे असं बोलतायेत. ज्या देवेंद्र फडणवीसांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेच्या पाठीत खंजीर खुपसला तो फडणवीस मुख्यमंत्री झाला पाहिजे असं राज ठाकरे म्हणत असतील तर मला तुमची लाज वाटते असंही संजय राऊतांनी सभेत सांगितले.

# शिवसेनेच्या दोन गटांत ‘पोस्टर वॉर!’

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील प्रचाराच्या तोफा उद्या थंडावतील. निवडणूक प्रचारातील अंतिम टप्प्यात आज शिवसेना प्रमुख हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची पुण्यतिथी होती. त्यांच्या स्मृतिदिनी शिवसेना विरूद्ध शिवसेना असा सामना रंगला आहे.

मुंबईत शिंदे गट आणि उद्धव गटात पोस्टर वॉर सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाने उद्धव ठाकरे गटाला डिवचले आहे. ठाकरे गटावर जोरदार प्रहार चढवला आहे. या पोस्टरची मुंबईतच नाही, तर राज्यभर ‘सोशल मीडिया’वर पण चर्चा रंगली आहे.

बाळासाहेब ठाकरे यांचे एक वक्तव्य शिंदे गटाने प्रसिद्ध केले आहे. विविध




वृत्तपत्रात त्याची जाहिरात आणि होर्डिंग लावण्यात आले आहे.

बाळासाहेब ठाकरे यांच्या मोठ्या छायाचित्रासह यामध्ये वाक्य देण्यात आले आहे. ‘मी, माझी शिवसेना कधीच काँग्रेस होऊ देणार नाही.’ असे बाळासाहेबांचे वाक्य प्रसिद्ध करण्यात आले आहे, तर उद्धव यांनी पण जाहिरात दिली आहे. भीती, भूक, भ्रष्टाचाराचा अंध:कार आता दूर करणार मशाल, असे वाक्य त्यावर लिहिले आहे. त्यात सर्वात खाली बाळासाहेबांची मशाल असे वाक्य लिहले आहे.

एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात शिवसेनेतील अनेक आमदार बाहेर पडले. शिवसेनेत उभी फूट पडली. शिंदे आणि भाजप यांनी महायुतीचे सरकार स्थापन केले.

तेव्हापासून शिवसेनेतील दोन्ही गटात धुमश्चक्री सुरू असते. दोन्ही गट आपलीच शिवसेना खरी असल्याचा दावा करतात. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतसुद्धा दोन्ही गटांनी अनेक मतदारसंघात एकमेकांविरोधात उमेदवार उभे केले आहेत. अनेक ठिकाणी दोन्ही गटात चुरस आहे. काही ठिकाणी बंडखोरांनी दोन्ही गटाचे टेन्शन वाढवले आहे. शिंदे गट महाराष्ट्राच्या निवडणुकीत ८१ ठिकाणी जागा लढवत आहे. तर उद्धव ठाकरे गटाने ९५ मतदारसंघात उमेदवार उभे केले आहेत.

# सोलापूरकरांचे नागरी विमानसेवेचे स्वप्न सत्यात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूरकरांची बहुप्रतिक्षित थेट विमानसेवा सुरू होणार आहे. होटगी रोड सोलापूर विमानतळावरून फ्लाय ९१ एअरलाईन्सची विमानसेवा २० डिसेंबर २०२४ पासून सुरू होणार असून मुंबई आणि गोवा यांसारख्या महत्त्वाच्या शहरांसाठी थेट उड्डाणे दिली जाणार आहेत. ही सेवा सुरू करण्यासाठी सोलापूर विकास मंचाच्या अथक प्रयत्नांमुळेच हे स्वप्न साकार होऊ शकले आहे.

सोलापूर जिल्ह्यात महामार्गाची कनेक्टिव्हिटी वाढल्यानंतर स्मार्ट सिटीतील सोलापूरकरांना आता विमानसेवेची प्रतीक्षा होती. पुणे, मुंबईतील एमआयडीसी हाऊसफुल झाल्यानंतर सोलापूर शहर- जिल्ह्यात उद्योगवाढीला मोठा वाव आहे, पण येथे आयटी कंपन्या नाहीत, मोठ्या प्रमाणावर



रोजगार देणारे व अपेक्षा पूर्ण करणारे नवीन उद्योग नाहीत. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यात दरवर्षी पाच हजार अभियंते शिक्षण पूर्ण करतात, पण नोकरीच्या निमित्ताने बहुतेकजण परजिल्ह्यातच जातात. दरम्यान, आता सोलापूर जिल्ह्यात कासेगाव, कुंभारी, मोडनिंब, अतिरिक्त चिंचोली या ठिकाणी नवीन एमआयडीसींचे प्रस्ताव आहेत. सोलापूर शहरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे इंदिरा गांधी पार्क स्टेडिअम आहे, पण विमानसेवा नसल्याने आंतरराष्ट्रीय सामने होण्यास अडचणी आहेत.

## » Selected

### एसटी-दुचाकी धडकेत दोघे ठार

**वाशिम :** एसटी आणि दुचाकीची समोरासमोर धडक झाली. या अपघातामध्ये दोन जणांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातामध्ये एसटीची दुचाकीला धडक बसल्यानंतर ५० फुटापर्यंत फरफटत नेले. अपघातानंतर संतप्त झालेल्या नागरिकांनी ‘रास्ता रोको’ आंदोलन केले. या अपघातामुळे रस्त्यावर वाहतूक कोंडी झाली होती. मिळालेल्या माहितीनुसार, वाशिमकडून हिंगोलीकडे जाणाऱ्या भरधाव एसटीची एका दुचाकीला जोरदार धडक बसली. अपघातामध्ये दोघांचा मृत्यू झाला. यामध्ये एक महिला आणि एका पुरुषाचा समावेश आहे. अपघातामध्ये महिलेचा जागीच मृत्यू झाला. दुसऱ्या व्यक्तीला रुग्णालयामध्ये घेऊन जात असताना त्याचा मृत्यू झाला.

### प्रवाशाकडून नव्वद लाख जप्त

**परभणी :** परभणी ते वसमत मार्गावर चिखली येथील तपासणी नाक्यावर रविवारी सकाळी आठ वाजता एका खासगी बसची तपासणी केली. या वेळी एक प्रवाशी घाबरला. त्यामुळे शंका आल्याने तेथे असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांनी बसमधील सर्वच बॅगची तपासणी केल्यानंतर ३ सॅकमधून तब्बल ८९.७८ लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात आली. या प्रकरणी तिघांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

### वंचितच्या उमेदवारावर हल्ला

**रत्नागिरी :** रत्नागिरी जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीला गालबोट लागले असून गुहागर तालुक्यात वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अण्णा जाधव यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला आहे. गुहागर तालुक्यात नरवण गावात हा हल्ला झाला आहे. या घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. उमेदवार जाधव यांना तात्काळ ग्रामीण रुग्णालय दाखल करण्यात आले आहेत. जाधव यांच्या हातावर चाकू हल्ला झाला, यात त्यांच्या हातावर खोल जखम झाली आहे. त्यांच्यावर रुग्णालयामध्ये उपचार सुरू आहेत.

### दहावी बारावी परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून यंदा दहावी, बारावीची परीक्षा दहा दिवस आगोदर घेतली जाणार आहे. बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारीपासून, तर इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा २१ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षेबाबत विद्यार्थ्यांच्या मनात भीती असते. अशावेळी परीक्षेदरम्यान येणाऱ्या अडचणी आणि स्मरणशक्तीचे गणित आताच जुळवावे लागणार आहे. दहावीचा पहिला पेपर मराठी, हिंदी व इतर प्रथम भाषा या विषयांचा राहील. दरम्यान वेळापत्रकानुसार कला, वाणिज्य, विज्ञान, एमसीव्हीसी आदी शाखांची परीक्षा होणार आहेत.

### जळगावमध्ये साडेपाच कोटींचे सोने-चांदी जप्त

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**जळगाव :** सध्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वत्र चोख बदोबस्त असून नाक्यानाक्यावर पोलिसांकडुन वाहनांची तपासणी सूरू आहे. अशाच एका तपासणीदरम्यान पोलिसांनी ४ किलो सोने व ३४ किलो चांदी जळगावमधून जप्त केली आहे. या सोन्या चांदीची किंमत ५ कोटी ५९ लाख ६१ हजाराच्या घरात आहे.

यानंतर पोलिसांनी वाहन चालकाची चौकशी केली असता शहरातील तीन ज्वेलर्स मालकांचे हे सोने चांदी असल्याची माहिती समोर आली आहे.

## अभिवादन बाळासाहेबांना

पंढरी संचार छायाचित्रसेवा




**मुंबई :** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज शिवसेनेचे संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांच्या १२व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या स्मारकावर अभिवादन केले.

# पवार, ठाकरेंत नुरा कुस्ती, योगी आदित्यनाथ यांची टीका

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ही निवडणूक केवळ सत्तेसाठी नाही, तर महाराष्ट्र आणि देशासाठी महत्वाची आहे. एकीकडे महायुती आहे आणि दुसरीकडे कोणतीही नीती आणि नैतिकता नसलेली आघाडी आहे. महाविकास आघाडीत नुरा कुस्ती चालू आहे. पवार आणि ठाकरेंमध्ये नुरा कुस्ती सुरू असून ते स्वत:ला आणि देशाला धोका देतील, अशी टीका उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केली.

आदित्यनाथ यांची कोल्हापूर जिल्ह्यातील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ सभा पार पडली. कोल्हापुरातील तपोवन मैदानात सभा झाली. या वेळी बोलताना योगी यांनी काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला. ते म्हणाले, की काँग्रेसचा इतिहासच देशाला धोका देण्याचा आहे. काँग्रेस नसता तर हा देश कधी तुटला नसता, देश तुटला नसता तर आज पाकिस्तान नसता. काँग्रेसच्या गुदगुल्याने आज पाकिस्तान आहे. ते म्हणाले, की काल प्रियंका आल्या होत्या.



### काँग्रेससाठी देश कायम दुय्यम

● काँग्रेसला कधी देश महत्त्वाचा वाटला नाही. काँग्रेस आघाडी सरकारच्या काळात दहशतवाद वाढला होता. मोदी पंतप्रधान झाल्यानंतर कुणी देशाकडे वाकड्या नजरेने पाहत नाहीत. हा नवीन भारत आहे. कुणी छेडले, तर सोडत नाही. ‘हम बटे थे तब अपमान सहन करना पडता था!’ अशी टीका योगी यांनी केली.

त्या विकासावर काही बोलले नसणार, त्या केवळ तोडण्याची भाषा करण्यासाठी आल्या होत्या.

मल्लिकार्जुन खर्गे यांचे घर निजामाने जाळले होते. यात खर्गे यांचे कुटुंब जळे. मी ‘बटेंगे तो कटेंगे’ म्हटल्यावर खर्गे यांना राग येतो. खर्गे लोकांना खरा इतिहास सांगा निजाम कोण होता असे आव्हान देऊन योगी म्हणाले, की बाळासाहेब ठाकरे असते तर त्यांनी कधी काँग्रेस बरोबर आघाडी केली असती का? पण उद्धव यांनी बाळासाहेब यांच्या मूल्यांना बाजूला करून काँग्रेसबरोबर आघाडी केली. महायुती सरकार आले, की विशाळगड अतिक्रमण आपोआप निघते. आपल्या गणेश मिरवणुकीवर कोण दगडफेक करणार नाही. त्यांना माहीत आहे जर दगडफेक केली तर उत्तर प्रदेशचा फॉर्म्युला येथे लागू होईल.

# महाराष्ट्रात महाविकास नव्हे, महाविनाश आघाडी : शिवराजसिंह

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** महाविकास आघाडीसह आणि राहुल गांधी यांच्याकडे विकासाचे कुठलेही व्हीजन नाही. केवळ जाहीर सभामधून खोटी आश्वासने देत जनतेची दिशाभूल करतात. राज्यामध्ये महाविकास आघाडीकडे विकासाचे कुठलेही मॉडेल नसून ही केवळ महाविनाश



आघाडी असल्याची टीका केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केली.

चौहान नागपुरात आले असता ते प्रसार माध्यमांशी बोलत होते. या वेळी शिवराजसिंह म्हणाले, की राहुल गांधी देशात एक आणि विदेशात वेगळे वक्तव्य करुन जनतेची दिशाभूल करतात. राज्यात महाविनाश आघाडी तयार करण्यात आली आहे. त्यांच्याजवळ विचार, व्यवहार आणि कुठलीही नीती नाही. जाती व धर्मावर केवळ राजकारण करण्याचे काम आघाडी सरकार करत आहे. मध्य प्रदेशमध्ये राबविण्यात आलेली लाडली बहीण योजना यशस्वी झाली आहे. तेथील गोरगरीबांना आर्थिक दृष्ट्यासक्षम करण्यासाठी योजना सुरू केल्यानंतर अनेक महिलांनी त्याच्या भरवश्यावर स्वत:चे उद्योग सुरू केले आहेत.

मध्य प्रदेश सरकार ही योजना चांगल्या पद्धतीने राबवित असून त्यासाठी १६ हजार कोटींची तरतुद करण्यात आली आहे. क़ॉंग्रेसने जाहिरनाम्यात महिलांना तीन हजार रुपये देण्याची घोषणा केली मात्र काँग्रेसच्या घोषणा फसव्या असतात, अशी टीका त्यांनी केली.

# प्रा. हाके यांची महायुतीच्या बाजूने ठाम भूमिका

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**जालना :** ओबीसी आरक्षणासाठी लढा उभारणारे नेते प्रा. लक्ष्मण हाके महायुतीच्या बाजूने भूमिका घेत थेट मैदानात उतरले आहेत. "ज्या ठिकाणी आमचे उमेदवार आहेत, ‘वंचित’चे उमेदवार आहेत तेथे ओबीसी मतदारांनी त्यांना मतदान करावे. ज्या ठिकाणी आमचे उमेदवार नाहीत, त्या ठिकाणी दगडापेक्षा वीट या युक्तीप्रमाणे महायुतीला ओबीसींनी मतदान करावे", असे त्यांनी म्हटले आहे.

प्रा. हाके म्हणाले, "ज्या आमदारांनी मनोज जरांगे यांना मराठा आरक्षणाला पाठिंबा असल्याचे लेखी पत्र दिले,



त्यांना ओबीसी भटक्या विमुक्त जातींमधील मतदारांना पाठिंबा देऊ नये. त्या आमदारांनी मागील पाच वर्षात काय केले. याचा जाब विचारावा." महायुती सरकारने मराठा समाजाला दहा टक्के आरक्षण दिले. मोदी सरकारने घटनादुरुस्ती करून ‘ईडब्ल्यूएस’मध्ये दहा टक्के आरक्षण दिले; परंतु हे दोन्ही आरक्षण मनोज जरांगे यांना मान्य नाही. मराठा समाजाला ओबीसीमधूनच आरक्षण हवे, अशी जरांगे यांची मागणी आहे. त्यामुळे गावाकडे ओबीसी आणि मराठा, असा द्वेष निर्माण झाला आहे. हा द्वेष निवडणुकीत दिसून येत आहे, असे त्यांनी सांगितले.

जरांगे हे शरद पवार यांनी दिलेल्या स्क्रिप्टनुसार काम करत आहेत. त्यामुळे २८८ मतदारसंघांपैकी केवळ ओबीसी नेते छगन भुजबळ यांच्या येवला मतदार संघात जाऊन जरांगे यांनी सभा घेतली, असा आरोप करून प्रा. हाके म्हणाले, की विधानसभेत ओबीसीची बाजू मांडण्यासाठी या निवडणुकीत किमान २० ते २५ ओबीसी आमदार आम्ही निवडून देणार आहोत. असेही प्रा. हाके म्हणाले.

## प्रियंका गांधी यांची टीका; प्रश्नांवरून लक्ष विचलीत करण्यासाठी ध्रुवीकरण

# रोजगार पळवल्याने युवकांच्या आत्महत्या

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**गडचिरोली :** काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियंका गांधी यांनी रविवारी सत्ताधारी भाजपच्या धोरणांवर टीका केली. काही मोठे प्रकल्प गुजरातमध्ये हलवल्यामुळे महाराष्ट्रातील युवकांच्या नोकऱ्या गेल्याचा आरोप त्यांनी केला. सत्ताधारी आघाडीचे नेते मूळ मुद्द्यांवरून लक्ष विचलीत करण्यासाठी समाजाचे ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न करीत आहेत, असे त्या म्हणाल्या.

गडचिरोली जिल्ह्यातील एका मेळाव्यात बोलताना त्यांनी राज्यातील महायुती सरकारच्या लाडकी बहीण



योजनेवर टीका केली. महिलांनी चांगल्या आयुष्यासाठी मतदान केले पाहिजे, त्यांना दरमहा १,५०० रुपये मिळतात म्हणून नव्हे, असे सांगून महाविकास आघाडी सत्तेवर आल्यास सोयाबीन पिकासाठी शेतकऱ्यांना प्रति क्विंटल सात हजार रुपये हमी भाव देण्याचे त्यांनी जाहीर केले. महाराष्ट्रात अडीच लाखांहून अधिक पदे रिक्त असल्याचा दावा गांधी यांनी केला. फॉक्सकॉन, एअरबस प्रकल्प गुजरातमध्ये हलवल्यामुळे राज्यातील नोकऱ्या गेल्या आहेत, असे त्या म्हणाल्या.

युवक प्रयत्न करत आहेत, नवीन कौशल्ये शिकत आहेत; पण तरीही त्यांना नोकऱ्या मिळत नाहीत. याकडे सरकारचे प्राथमिक लक्ष असायला हवे होते; देशात सर्वाधिक तरुणांच्या आत्महत्या महाराष्ट्रात होत आहेत. त्याचे कारण बेरोजगारी हटवण्यात भाजपच्या अपयशाचा हा परिणाम आहे, अशी टीकाही त्यांनी केली आहे.

### मोदींच्या राजवटीत अदानीच सुरक्षित

● निवडणूक प्रचारादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ‘एक है तो सेफ है’ असे घोषवाक्य वापरले. त्याचा समाचार प्रियंका यांनी घेतला. 'सेफ' या शब्दाचे दोन अर्थ आहेत, सुरक्षा आणि खजिना. या देशात अदानी ही एकमेव व्यक्ती खरोखर सुरक्षित आहे. संपूर्ण देशाला माहीत आहे, की अदानी ही एकमेव व्यक्ती आहे, जिला सरकारी तिजोरीत प्रवेश आहे, तर सामान्य नागरिक संघर्ष करत आहेत, अशी टीका त्यांनी केली.

# अन्यथा धरण उशाशी अन् शेतकरी उपाशी

## डिंभे धरणावरून अजित पवार यांनी दिला इशारा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**जुन्नर :** मी कधीही दुसऱ्याच्या तोंडातला घास काढणार नाही. डिंभे धरणाचे ओव्हरफ्लोचे पाणी सोडायचे आहे, ते वरच्या पातळीवरच झाले पाहिजे, याची खबरदारी आपण घेणार आहोत. अन्यथा धरण उशाशी अन् जुन्नरचा शेतकरी उपाशी हे चालणार नाही, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ओतूर येथे बोलताना स्पष्ट केले.




महायुतीचे उमेदवार तथा विद्यमान आमदार अतुल बेनके यांच्या प्रचारार्थ सभेत अजित पवार बोलत होते. यावेळी पुणे म्हाडाचे अध्यक्ष तथा माजी खासदार शिवाजी आढळराव पाटील, जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर, जुन्नर बाजार समितीचे सभापती संजय काळे, पांडुरंग पवार, गणपतराव फुलवडे, पूजा बुट्टे, सूर्यकांत ढोले, भाऊ देवाडे, पापा खोत, मारुती वायाळ, काळूराम शेळकंदे, फिरोज पठाण, उज्ज्वला शेवाळे, सुप्रिया लेंडे, पुष्पाताई गोसावी, प्रकाश ताजणे, विकास दरेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

अजित पवार म्हणाले की, नगरच्या भाषणात पावसाचा पडणारे पाणी पश्चिमेकडे जाऊन समुद्राकडे जाते ते वळवण्यासाठी ८५ हजार कोटींच्या प्रकल्पाला मान्यता दिली. प्रकल्पाचे पाणी आपल्याला नाशिक आणि नगर जिल्ह्यामध्ये आणायचे आहे, असे सांगण्याचा नगरच्या सभेत मी प्रयत्न करीत होतो; परंतु माझ्या भाषणाच्या क्लिप मध्ये छेडछाड करून चुकीच्या पद्धतीने व्हायरल करण्यात आली.

जुन्नर विधानसभेच्या निवडणुकीत अतुल बेनके तालुक्याला धडाकेबाज आमदार लाभलेला आहे. ते मतदारसंघातील सिंचनाचा, रोजगाराचा, पाण्याच्या प्रश्नासाठी सातत्याने काम करीत असून जुन्नरकरांच्या सुखदुःखात सहभागी होत आहे. त्यांनी कधी जातीपातीचा, नात्यागोत्याचा विचार केला नाही. आम्ही सर्व धर्म समभाव विचाराचे आहोत. महायुतीचे सरकार आणण्यासाठी आपल्या पवित्र मतांची गरज असून अतुल बेनके यांना बहुसंख्य मतांनी विधानसभेत पाठवा, असे आवाहन त्यांनी केले.





### बेनके यांना पुन्हा विधानसभेवर पाठवायचे आहे...

● जुन्नर शहरात मोठे रॅली निघाल्याचे कळले; परंतु त्याचे रुपांतरण मतदानात झाले पाहिज, अन्यथा फतवा निघाला असे सांगून मतपरिवर्तन करू नका. स्व. वल्लभ बेनके हयात नसताना अतुल बेनके यांची पहिली निवडणूक आहे. त्याला याला पोरका करायचा नाही. बेनके कुटुंबीयाने जुन्नरची खूप सेवा केली आहे. मी स्वतः अतुल बेनके यांच्या पाठीशी भक्कमपणे उभा आहे. अतुल हे कष्ट करणारा, शांत स्वभावाचा आहे. त्यांना बहुसंख्या मतांनी अतुल बेनके यांना पुन्हा विधानसभेत पाठवून स्व. वल्लभ बेनके यांना श्रद्धांजली वाहायची आहे, असे अजित पवार यांनी स्पष्ट केले.

# अजित पवारांचा बारामतीत झंझावात



बारामती

**बारामती :** विधानसभा निवडणुकीचा प्रचार ऐन भरात आला असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महाराष्ट्रात सर्वत्र सभा घेण्याचा धडाका कायम ठेवला आहे. त्याचवेळी त्यांच्या स्वतःच्या बारामती मतदारसंघातही त्यांनी गावोगावी जात ग्रामस्थांची थेट भेट घेण्याचे धोरण अवलंबले आहे. कऱ्हावागज गावात जाऊन अजित पवार यांनी ग्रामस्थांची स्नेहपूर्ण भेट घेतली. गावातील अनेक वर्षे प्रलंबित पाण्याचा प्रश्न लवकरच मार्गी लागणार आहे, त्या दिशेने वेगाने पावले टाकली जात आहेत. पिण्याचे आणि शेतीसाठी पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध केले जाईल. अन्य विकास कामे देखील हाती घेतली जातील, असा शब्द त्यांनी गावकऱ्यांना दिला.

बारामतीतील माळेगाव खु. आणि ढाकाळे या गावांनाही त्यांनी भेट दिली, ग्रामस्थांशी मनमोकळा आपलेपणाचा संवाद साधला. गावातील प्रलंबित कामांकडे जातीने लक्ष देऊन ती मार्गी लावू, असा विश्वास दिला. तसेच गावकऱ्यांच्या समस्या जाणून घेत त्यावर ठोस पावले उचलू, असे आश्वस्त केले.

राज्यात विधानसभा निवडणुकांच्या प्रचाराचा अंतिम टप्पा सुरु आहे. अनेक नेते दावे-प्रतिदावे करत आहेत. अशातच "सर्वांगीण विकासासाठी आगामी निवडणुकीमध्ये महायुतीच्याच सर्व उमेदवारांना निवडून देत राज्यात युतीची सत्ता आणायची आहे. बारामतीकरांनीही लोकसभेला जशी आमची गंमत केली, तशी करू नये," अशी साद उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मतदारांना घातली आहे. अजित पवार यांनी शनिवारी बारामती तालुक्यात वेगवेगळ्या ठिकाणी प्रचार सभा घेतल्या. त्यात बोलत असताना त्यांनी ही अपेक्षा व्यक्त केली आहे.

# दिलीप मोहिते-पाटील मंत्रिमंडळात असतील

## एक लाखाच्या मताधिक्याने विजयी करण्याचे अजित पवार यांचे आवाहन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**चाकण :** दिलीप मोहिते पाटील माझ्या सोबत मंत्रिमंडळात असतील. त्यांना एक लाखाच्या मताधिक्याने विजयी करा. नाशिक फाटा ते राजगुरुनगर पर्यंत मेट्रो आणणार हा आमचा वादा असून, शासकीय योजना सुरू राहण्यासाठी मतदारांनी महायुतीला साथ द्यावी, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

खेड आळंदी विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रचार सभेचे आयोजन चाकण येथे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी अजित पवार बोलत होते.

अजित पवार म्हणाले की, महायुतीच्या सर्वात जास्त जागा निवडूण येण्यासाठी आम्ही सर्वजण एकत्र येऊन काम करत आहोत. मंचावर सगळे जण महायुतीचे पदाधिकारी एकत्र आहेत. केंद्रात आपल्या विचारांचे सरकार आहे. लोकसभा निवडणुकीत पॉइंट ६ टक्के मते फक्त कमी पडली. विरोधकांनी चुकीचा नरेटिव्ह सेट केला. घटना बदलणार आहेत, असे सांगितले. फेक नरेटिव्ह विरोधकांनी सेट करुन जनतेत संभ्रम तयार करण्याचे काम केले, असा आरोप त्यांनी केला. आमच्या सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला. उसावरील इन्कम टॅक्स रद्द केला. शेतकऱ्याच्या उसाला चांगला हमी भाव आम्ही देतोय. नाशिक फाटा ते राजगुरुनगर पर्यंत आम्ही मेट्रो करतोय. हा आमचा वादा आहे. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी अतिक्रमणे हटविली, त्यामुळे छोटे व्यवसायिक नाराज झाले. पण सगळ्यांना खुश ठेवताना काही जण नाराज होतात, असेही ते म्हणाले. सूत्रसंचालन आदेश टोपे यांनी, तर आभार राम गोरे यांनी मानले.

खेड



# शेतकऱ्यांचे संसार सुरक्षित ठेवणे हेच माझे काम

## सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांचे प्रतिपादन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**आंबेगाव:** आंबेगाव, शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांचे हक्काचे पाणी नगर जिल्ह्यात जाऊ नये, याचसाठी आपण राजकीय निर्णय घेतले. तालुक्यातील जनतेचे संसार सुरक्षित ठेवणे, हेच माझे काम आहे. आपण पाण्यासाठी ही निवडणूक लढवत आहोत. जनतेने मला पुन्हा एकदा संधी द्यावी, असे प्रतिपादन सहकारमंत्री व महायुतीचे उमेदवार दिलीप वळसे पाटील यांनी केले.



घोडेगाव (ता. आंबेगाव ) येथे महाविजय निर्धारसभेत बोलताना महायुतीचे उमेदवार दिलीप वळसे पाटील.

आंबेगाव

घोडेगाव (ता. आंबेगाव ) येथे आंबेगाव शिरूर विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार दिलीप वळसे पाटील यांच्या प्रचारार्थ महाविजय निर्धार सभा झाली. यावेळी वळसे पाटील बोलत होते. माजी खासदार व म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, शरद सहकारी बँकेचे अध्यक्ष देवेंद्रशेठ शहा, भीमाशंकर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे, भाजपा किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय थोरात, वसंत काळे, माजी सभापती कैलासबुवा काळे, सखाराम घोडेकर, अजय आवटे, सुर्यकांत वाघमारे, अजित काळे, रूपाली झोडगे, सरपंच अश्विनी तिटकारे, क्रांती गाढवे, रत्ना गाडे, ज्योती घोडेकर, तुलसी भोर, दादाभाऊ पोखरकर, नवनाथ हुले, संतोष सैद, कपिल काळे, कपिल सोमवंशी आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

दिलीप वळसे पाटील म्हणाले, प्रत्येक निवडणुकीत देश किंवा राज्य पातळीवर एखादा विषय असतो. त्यावर निवडणूक लढवली जाते. मात्र, आता आपल्यासमोर डिंभे धरणाच्या पाण्याचा प्रश्न उभा राहिला आहे. डिंभे धरणाला बोगदा करण्यासाठी नगर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी रोहित पवार, खासदार नीलेश लंके, घनश्याम शेलार, उद्धव ठाकरे, अण्णा हजारे एकत्र आले आहेत. हा बोगदा झाला, तर डिंभे धरण तीन महिन्यातच रिकामे होऊन तालुक्यात पुन्हा दुष्काळी स्थिती निर्माण होईल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. देवदत्त निकम यांनी बोगद्यावर बोलणे टाळून ईडी, सीबीआयच्या भीतीमुळेच आपण पवारांची साथ सोडल्याचे सांगत सुटले आहेत. मात्र, माझ्यासाठी पाण्याचा विषय हा महत्त्वाचा असून, काही झाले तरी मी शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी बोगद्याद्वारे नगर जिल्ह्यात जाऊ देणार नाही, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.



# माऊली कटके यांचा विजय निश्चित

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

शिरूर

**शिरूर :** आजच्या या प्रचार सभेला जमलेली गर्दी बघता माऊली कटके यांचा विजय आजच निश्चित झालेला आहे. याच विजयाच्या जोरावर सध्या बंद असलेला घोडगंगा सहकारी साखर कारखाना पुढल्या वर्षी सुरू करणार आहे. उसाचा गळीत हंगाम सुरू झाला आहे. आपल्या उसाचे काय होणार? म्हणून शेतकरी वर्ग घाबरलेला आहे. मात्र, शेतकऱ्यांनो तुम्ही घाबरू नका. तुमच्या शेतातील ऊस नेण्यासाठी दौंड शुगर, अंबालिका, पराग, श्रीनाथ म्हस्कोबा, सोमेश्वर व माळेगाव कारखान्याला सांगू. तुमच्या शेतात उसाचे एक टिपरु सुद्धा दिसू देणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे.

शिरूर हवेली विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर कटके यांच्या प्रचारानिमित्त न्हावरे येथील सभेत ते बोलते होते. शिरूर हवेली विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर कटके यांच्या प्रचारानिमित्त न्हावरे येथे रविवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास सभेचे आयोजन करण्यात आले होते.

# आंबेडकरी चळवळीला प्रस्थापित राजकारणात प्रतिष्ठा कधी ?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** सत्ताधारी राजकारणी पक्षा सह विरोधकांना देखील "पुरोगामी चेहरा "आत्मसात करण्यासाठी आंबेडकरी चळवळ व समाज आपल्या पक्षामध्ये निवडणुक काळात असणे आवश्यक व गरजेचे वाटते. फुले, शाहू आंबेडकर, अण्णा भाऊ साठे यांच्या विचारांची चळवळ नेटाने पुढे चालविणाऱ्या नेतृत्वाला पक्षीय राजकारणात प्रवेश दिला जातो मात्र तालुकास्तरावर त्यांना राजकीय प्रक्रियेत डावलले जात असल्याने आंबेडकरी जनतेत पक्षीय कार्यपध्दती बद्दल नाराजीची भावना निर्माण होताना दिसत आहे.

दलित बहुजन समाजातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते यांचा केवळ मागासवर्गीय नेतृत्वाचा चेहरा दलित मतावर डोळा ठेवून त्याचा नुसता पक्षीय प्रवेश केला जातो परंतु त्यांना राजकारणातील प्रक्रियेत समावून घेतले जात नाही अशी नाराजीची भावना समाजात आहे. समाजाच्या हिताच्या प्रश्नांना व मतदारांना महत्व प्राप्त करून देता येत नसेल तर सध्याच्या विधानसभा निवडणूकीसह आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका निवडणुकात आंबेडकरी चळवळीची ताकद समाज निश्चितपणाने दाखविल.



तसेच दलित बहुजन समाज नेत्यानी एकत्र येऊन भविष्य काळाचा निकाल या निवडणुकीच्या निमित्ताने घेणे गरजेचे आहे नाही. केवळ राजकीय निवडणुका कामासाठी समाजाचा व त्यांच्या नेतृत्वाचा वापर होणार असेल आणि निवडणूका नंतर सत्तेचा उपयोग समाजासाठी होणार नसेल तर स्वार्थासाठी पाठींबा देणा-या व राजकीय कामासाठी दुसऱ्या पक्षात जावून काम करणाऱ्या नेत्यांना नेतृत्वाला समाजात मते मागण्यासाठी समाज फिरु देणार नाही.त्यांना जाब विचारेल अशी तीव्र प्रतिक्रिया मागासवर्गीय समाजातून उमटत आहे.

**तात्यांची उणीव पण रत्नाकरची उपेक्षा**

तालुक्यातील मागासवर्गीय समाजातील 'दलितांच्या राजकारणाचे समाज कारणाचे दादूमिया' म्हणून ओळख असणारे स्मृती शेष रत्नाकर मखरे (तात्या) पूर्वाश्रमीचे महार व आताचे नवबौध्द, मातंग, चर्मकार समाजातील व बहुजन समाजातील वंचित, अन्यायग्रस्त, पिडीत लोकांना न्याय मिळवून देणारे, त्यांच्या आत्मसन्मानासाठी, स्वाभिमानासाठी प्रयत्न करणारे, फुले, शाहू, आंबेडकरी चळवळीचे नेतृत्व करणारे "मखरे तात्या" त्यांचे पश्चात ही पहिलीच विधानसभा निवडणुक पार पडत आहे.

» क्रमशः

# लाडक्या बहीणींना पैसे मिळू न देणाऱ्या आघाडीला धडा शिकवा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**शिरूर :** लाडक्या बहीण योजनेतून महिलांना पैसे मिळू नये यासाठी महाविकास आघाडीने खूप प्रयत्न केले. यासाठीच त्यांनी कोर्टात देखील धाव घेतली. परंतू राज्यातील महायुतीच्या सरकारने लाडकी बहीण योजनेतून महिलांना आर्थिक सक्षम साक्षर करण्याचे काम केले. महायुतीला राज्यातील तमाम महिलांचे पाठबळ मिळणार आहे. बहिणींना पैसे मिळू न देणाऱ्या महाविकास आघाडीला धडा शिकवण्यासाठी आपण महायुतीचे उमेदवार दिलीप वळसे पाटील यांना प्रचंड बहुमताने विजयी करावे, असे आवाहन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी केले.



रांजणगाव गणपती येथे आंबेगाव शिरूर विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार दिलीप वळसे पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित महाविजय महिला निर्धार मेळावा संपन्न झाला. यामध्ये रूपाली चाकणकर बोलत होत्या. यावेळी माजी खासदार व म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, सिनेअभिनेते सयाजी शिंदे, माजी आमदार पोपटराव गावडे, शरद बँकेचे अध्यक्ष देवेंद्रशेठ शहा, किरणताई वळसे पाटील, राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्राच्या संचालिका पूर्वा वळसे पाटील, जयश्री पलांडे, भाजपाचे पक्षनिरीक्षक अतुल ब्रम्हभट, सुनिता गावडे, मानसिंग पाचुंदकर, आदी मान्यवर उपस्थित होते. रुपाली चाकणकर म्हणाल्या की, महायुती सरकारने शेतकऱ्यांसाठी विज माफीची योजना आणली. मुलींसाठी मोफत शिक्षणाची योजना आणली. योजनांचा महिलांना चांगला फायदा झाल्याने महिला या आर्थिक सक्षम व साक्षर झाल्या आहेत. त्यामुळे महायुतीच्या पाठीमागे मातृशक्ती एकवटली आहे, असा दावा त्यांनी केला.

### आंदोलनाला हिंसक वळण; मैतेईंचा २४ तासांचा अल्टिमेटम

# मणिपूरमध्ये मुख्यमंत्री, मंत्र्यांच्या घरांवर हल्ले

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क


मुख्यमंत्र्यांच्या घरावर हल्ला करणाऱ्या जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या.

**इंफाळ :** मणिपूरमध्ये पुन्हा एकदा हिंसाचार उसळला आहे. संतप्त जमावाने मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांच्या खासगी निवासस्थानावरही हल्ला केला. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. बिरेन सिंग त्या वेळी घरी नव्हते. अन्य मंत्र्यांच्या घरावरही हल्ले करण्यात आले.

राज्य सरकारने अलीकडेच इंफाळमध्ये संचारबंदी लागू केली आहे. येथील तीन जणांच्या हत्येनंतर उसळलेल्या निदर्शनांच्या पार्श्वभूमीवर सहा जिल्ह्यांत इंटरनेट सेवा बंद करण्यात आली आहे. आंदोलकांनी इम्फाळमध्ये दोन मंत्री आणि तीन आमदारांच्या घरांवर हल्ला केला. त्यानंतर आंदोलनाला हिंसक वळण लागले. मिळालेल्या माहितीनुसार, इंफाळ पश्चिम जिल्ह्यातील लानफेले संकेथेल येथील आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री सपम रंजन यांच्या निवासस्थानावरही जमावाने हल्ला केला. त्याचवेळी जमावाने ग्राहक व्यवहार आणि सार्वजनिक वितरण मंत्री एल. सुसिंद्रो सिंग यांच्या घरालाही लक्ष्य केले.

मुख्यमंत्री सिंह यांचे जावई आणि भाजप आमदार आरके इमो यांच्या घराबाहेरही आंदोलक जमले होते. या वेळी आंदोलकांनी सहा जणांच्या हत्याकांडावर योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली होती. २४ तासांत दोषींना अटक करण्याची मागणी आंदोलकांनी केली होती. केशमथोंग मतदारसंघातील तिड्डीम रोड येथील अपक्ष आमदार सपम निशिकांत सिंह यांच्या घराबाहेरही आंदोलकांनी निदर्शने केली. या वेळी आंदोलकांनी आमदारांच्या मालकीच्या स्थानिक वृत्तपत्राच्या कार्यालयावरही हल्ला केला. जिरीबाम जिल्ह्यातील बेपत्ता झालेल्या सहापैकी तीन जणांचे मृतदेह शुक्रवारी रात्री मणिपूर-आसाम सीमेवर जिरी आणि बराक नद्यांच्या संगमाजवळ सापडले होते. यामध्ये काल रात्री आसाममधील सिलचर येथे एक महिला आणि दोन मुलांचे मृतदेह आणण्यात आले. पोलिस शवविच्छेदन अहवालाची वाट पाहत आहेत. ओळखीसाठी छायाचित्रे गोळा करण्यात आली आहेत.

दरम्यान, पोलिसांनी सांगितले, की बिष्णुपूर जिल्ह्यातील इरेंगबाम मॅनिंग भागात संशयित अतिरेक्यांची सुरक्षा दलांशी संक्षिप्त चकमक झाली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचे त्यांनी सांगितले. १४ नोव्हेंबर रोजी, गृह मंत्रालयाने इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील सेकमाई आणि लमसांग, इम्फाळ पूर्वेतील लामलाई, बिष्णुपूरमधील मोइरांग, कांगपोकपीमधील लिमाखोंग आणि जिरीबाम जिल्ह्यातील जिरीबाम अंतर्गत भागात 'अफ्स्पा' कायदा पुन्हा लागू केला.

दरम्यान, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी मणिपूरच्या घटनेवरून संताप व्यक्त करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली. ७ नोव्हेंबरपासून आतापर्यंत १७ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. संघर्षग्रस्त भागांच्या यादीत नवीन जिल्हे जोडले जात आहेत आणि आग सीमेवरील ईशान्येकडील राज्यांमध्ये पसरत आहे. मणिपूर या सुंदर सीमावर्ती राज्यात तुम्ही पूर्णपणे अपयशी ठरला आहात. भविष्यात तुम्ही मणिपूरला गेलात, तरी राज्यातील जनता कधीही अशी टीका त्यांनी केली.

**ना एकसंघ, ना सुरक्षित!**

● तुमच्या डबल इंजिन सरकारमध्ये ना मणिपूर एकसंघ आहे, ना मणिपूर सुरक्षित आहे. मे २०२३ पासून राज्य अकल्पनीय वेदना, विभाजन आणि वाढत्या हिंसाचारातून जात आहे. आपल्या लोकांचे भवितव्य उद्ध्वस्त झाले आहे. भाजपला त्यांच्या घृणास्पद विभाजनवादी राजकारणामुळे मणिपूर जाळायचे आहे, असा आरोप खर्गे यांनी केला.

# 'आप'ला निवडणुकीपूर्वीच मोठा झटका

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** दिल्लीच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. 'आम आदमी पक्षा'च्या आतिशी सरकारमधील कॅबिनेट मंत्री कैलाश गेहलोत यांनी मंत्रिपदाचा आणि पक्षाचा राजीनामा दिला आहे. 'आप'चा राजीनामा देत त्यांनी राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांना पत्र लिहिले आहे.

गेहलोत यांनी पत्रात लिहिले आहे, की शीशमहलसारखे अनेक लाजिरवाणे आणि विचित्र वाद आहेत. सामान्य माणूस आता शंका घ्यायला लागला आहे. दिल्ली सरकार मुख्यमंत्री निवासावर सर्वाधिक खर्च करत असेल, तर केंद्राशी लढण्यात वेळ घालवला जात आहे. दिल्लीची खरी प्रगती होऊ शकत नाही. माझ्याकडे 'आप'पासून फारकत घेण्याशिवाय पर्याय नाही आणि म्हणून मी आम आदमी पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देत आहे.

गेहलोत यांनी 'आम आदमी पक्षा'वर आरोप करत म्हटले आहे, की ज्या प्रामाणिक राजकारणामुळे ते पक्षात आले होते ते आता होत नाही. केजरीवाल यांचे अधिकृत निवासस्थान 'शीशमहल' असल्याचे सांगून त्यांनी अनेक आरोप केले. त्याचबरोबर यमुनेच्या वाढत्या प्रदूषणाबाबतही त्यांनी दिल्ली सरकारवर आरोप केले. आज आम आदमी पक्षाला गंभीर आव्हानांचा सामना करावा लागत आहे. राजकीय महत्त्वाकांक्षेमुळे आम्ही लोकांशी केलेली वचनबद्धता मागे पडली आहे.

आम्ही यमुना नदीचे स्वच्छ नदीत रूपांतर करण्याचे आश्वासन दिले होते; परंतु ते कधीच करू शकलो नसल्याचे ते म्हणाले.

> 'मी माझा राजकीय प्रवास दिल्लीच्या लोकांची सेवा करण्याच्या वचनबद्धतेने सुरू केला होता आणि मला तो पुढे चालू ठेवायचा आहे. त्यामुळेच माझ्याकडे 'आप'शी फारकत घेण्याशिवाय पर्याय उरला नाही आणि म्हणूनच मी प्राथमिक पदाचा राजीनामा देत आहे.
> **- कैलाश गेहलोत,** 'आप'चा त्याग केलेले परिवहनमंत्री


नायजेरिया येथे आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे उत्स्फुर्त स्वागत करण्यात आले.

## मोदी यांना आणखी एका देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क

**अबुजा :** पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या तीन देशांच्या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात रविवारी आफ्रिकन देश नायजेरियाला पोहोचले. पंतप्रधान मोदी यांचे विमान अबुजा, नायजेरिया येथे उतरले. तेथे त्यांचे नायजेरियन सरकारचे मंत्री न्यासोम इझेनवो वाइके यांनी जोरदार स्वागत केले.

नायजेरिया सरकारच्या मंत्र्याने आदरार्थी म्हणून अबुजा शहराच्या चाव्या पंतप्रधान मोदी यांना दिल्या. खरे तर ही चावी नायजेरियातील जनतेने पंतप्रधान मोदींप्रती दाखविलेल्या आदर आणि विश्वासाचे प्रतीक आहे. यानंतर आता नायजेरिया मोदी यांना 'द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द नायजर'या पुरस्काराने सन्मानित करणार असल्याची माहिती समोर आली आहे. मोदी यांना प्रदान करण्यात येणारा हा १७ वा आंतरराष्ट्रीय पुरस्कार असेल. राणी एलिझाबेथ या एकमेव परदेशी मान्यवर आहेत, ज्यांना १९६९ मध्ये हा 'द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द नायजर' हा पुरस्कार मिळाला आहे. यानंतर मोदी हे दुसरे विदेशी असणार आहेत, ज्यांचा या पुरस्काराने सन्मान होणार आहे.

मोदी यांचा पश्चिम आफ्रिकन प्रदेशाचा पहिला दौरा आहे. ते सध्या नायजेरिया, ब्राझील आणि गयाना येथे थांबलेल्या पाच दिवसांच्या दौऱ्यावर आहे. नायजेरियाच्या दौऱ्यानंतर मोदी यांचा ब्राझीलचा दौरा आहे. या देशांसोबत भारताचे राजनैतिक आणि आर्थिक संबंध दृढ करण्यासाठी हा दौरा महत्त्वपूर्ण आहे.

## मुकुट विश्वसुंदरीचा

पंढरी संचार छायाचित्रसेवा


**कोपनहेगन :** डेन्मार्कची व्हिक्टोरिया केजर थेलविग हिने ७३ व्या 'मिस युनिव्हर्स'चा किताब जिंकला आहे. डेन्मार्कच्या सौंदर्यवतीने 'मिस युनिव्हर्स' स्पर्धा जिंकण्याची ही पहिलीच वेळ आहे.

## » Selected

### झाशी मेडिकल कॉलेज आगीचा अहवाल सादर, कारण समोर

**लखनऊ :** झाशी येथील मेडिकल कॉलेजच्या नवजात शिशू कक्षाच्या अति दक्षता विभागाला लागलेल्या आगीशी संबंधित



अहवाल मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना सादर करण्यात आला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, झाशीचे विभागीय आयुक्त आणि डीआयजी यांनी मुख्यमंत्र्यांना अहवाल सादर केला आहे. या अहवालात आगीचे कारण स्पष्ट करण्यात आले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या आगीचे कारण विद्युत अपघात आहे. स्वीच बोर्डला आग लागल्याने हा प्रकार घडला; परंतु सायंकाळी पाच वाजता झालेल्या शॉर्टसर्किटकडे दुर्लक्ष झाले असते, तर हा प्रकारच घडला नसता, असे सांगण्यात येते. नवजात मुलांच्या कक्षात पाण्याची सोय करणे वैद्यकीयदृष्ट्या योग्य मानले जात नाही, असे कारण देण्यात आल आहे.

### पाच रुपयांवरून मुलाचा खून

**लखनऊ :** उत्तर प्रदेशातील हरदोई जिल्ह्यात उसाच्या शेतात एका निष्पाप मुलाचा मृतदेह सापडला. हा खून करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. दोन मुलांमध्ये पाच रुपयांवरून झालेल्या वादातून ही हत्या झाल्याचे सांगण्यात येत आहे. आरोपीने निष्पाप मुलाला उसाच्या शेतात नेऊन गळा आवळून खून केला. नीतराम यांचा मुलगा घराबाहेर खेळत असताना अचानक बेपत्ता झाला. त्यानंतर त्याचा मृतदेह उसाच्या शेतात तुकड्या-तुकड्यांमध्ये सापडला. २८ मीटर अंतरावर नग्न मृतदेहाचे हात व पाय सापडले. निष्पाप बालकाचा मृतदेह कुजण्यास सुरुवात झाली होती.

### आजीने नवजात नातवाला विकले तीन लाखांना

**लखनऊ :** उत्तर प्रदेशातील जौनपूरमधील जलालपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील धरोन गावात एका महिलेने स्वत:च्या मुलीचे नवजात बाळ तीन लाख रुपयांना विकले. कैलास प्रजापती यांची मुलगी कविता हिचा विवाह भदोही जिल्ह्यात झाला होता. कविता आई होणार होती. तिचा नवरा सुरत येथे काम करतो. प्रसूतीसाठी ती माहेरी आली होती. मुलीच्या प्रसूतीसाठी आईने तिला २५ ऑक्टोबर रोजी जौनपूरच्या प्रताप रुग्णालयात दाखल केले. ऑपरेशननंतर पीडितेने मुलाला जन्म दिला. त्यानंतर आशा आणि इतर काही महिलांनी कविताच्या आईशी म्हणजेच मुलाच्या आजीशी बोलून तिच्याकडून मूल विकत घेण्याचे आणि मुलाच्या बदल्यात तीन लाख रुपये देण्याचे मान्य केले. त्यानंतर आजीने नातवाची तीन लाखांना विक्री केली.

### रशियाचा युक्रेनवर मोठा हल्ला

**कीव :** रशियाने युक्रेनवर मोठा हवाई हल्ला केला आहे. युक्रेनची राजधानी कीववर हा हल्ला करण्यात आला आहे. मिळालेल्या



माहितीनुसार, रशियाने ६० क्षेपणास्त्रे डागली आहेत. युक्रेनवर करण्यात आलेला हा आतापर्यंतचा सर्वात मोठा हल्ला मानला जात आहे. या हल्ल्यांदरम्यान लोकांनी आपला जीव वाचवण्यासाठी बंकरची मदत घेतली. गेल्या काही दिवसांत रशियाकडून युक्रेनवर अनेक ड्रोन हल्ले करण्यात आले आहेत; पण ट्रम्प हेही त्यांचा शांतता फॉर्म्युला घेऊन पुढे जात आहेत. केवळ कीवमध्येच नव्हे तर इतरही काही ठिकाणी हल्ले करण्यात आले आहेत. यासोबतच इराणमधून घेतलेल्या ड्रोनचाही या हल्ल्यात वापर करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. लोक अजूनही बंकरमध्ये असल्याची माहिती आहे आणि जोपर्यंत हवाई हल्ले सुरू आहेत, तोपर्यंत त्यांना बंकरमध्येच राहण्यास सांगण्यात आले आहे. अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशिया-युक्रेन युद्धात झालेल्या जीवितहानीबद्दल दु:ख व्यक्त केले आहे.

# एलॉन मस्क यांची क्रांतीकारी योजना येणार अस्तित्वात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** एलन मस्क यांचे 'स्पेसएक्स; आपली प्रवासाची पद्धत बदलणार आहे. कंपनी अतिशय क्रांतिकारी प्रकल्पावर काम करत आहे. मस्क यांच्या कंपनीच्या नव्या योजनेमुळे प्रवाशांना जगभरातील प्रमुख शहरांमधून एका तासापेक्षा कमी वेळात प्रवास करणे शक्य होणार आहे. या महत्त्वाकांक्षी संकल्पनेचा केंद्रबिंदू म्हणजे स्टारशिप, स्टेनलेस स्टीलचे बनलेले ३९५ फूट उंच अंतराळयान.

अब्जाधीश मस्क आणि विवेक रामास्वामी हे 'डिपार्टमेंट ऑफ गव्हर्नमेंट इफिशियन्सी' (डीओजीई) चे नेतृत्व करणार आहेत. ट्रम्प निवडून आल्यावर त्यांच्या स्टारशिप रॉकेटवर 'पृथ्वी ते पृथ्वी' अंतराळ प्रवासाची त्यांची महत्त्वाकांक्षी योजना आता शक्य असल्याचे मस्क यांनी सांगितले. 'डेली मेल'मधील एका अहवालानुसार, जवळजवळ दशकापूर्वी 'स्पेसएक्स'ने कल्पना केलेली पृथ्वीवरील सर्वात शक्तिशाली रॉकेट स्टारशिप १,००० प्रवासी घेऊन जाईल. स्टारशिप लोकांना लॉस एंजेलिस ते टोरंटो २४ मिनिटांत, लंडन ते न्यूयॉर्क २९ मिनिटांत, दिल्ली ते सॅन फ्रान्सिस्को ३० मिनिटांत आणि न्यूयॉर्क ते शांघाय ३९ मिनिटांत पोहोचवू शकते.

# लहान मुलांवरुनचा वाद टोकाला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पाटणा :** पूर्णिया येथे लहान मूल खेळत असताना वाद झाला आणि दोन पक्षांमध्ये जोरदार हाणामारी झाली. या मारामारीत एका तरुणाचा मृत्यू झाला.

या घटनेत दोन्ही बाजूचे दोन महिलांसह १० जण जखमी झाले आहेत. त्यापैकी चौघांची प्रकृती गंभीर आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून मृतदेह ताब्यात घेतला. या प्रकरणाची चौकशी करण्यात येत आहे. शनिवारी सायंकाळी उशिरा ही घटना घडली. दिनेश साहनी (४० वर्षे) असे मृताचे नाव असून तो दरभंगा जिल्ह्यातील बैनीपूर नवतोलिया येथील रहिवासी आहे. जखमींमध्ये मृताचे वडील फुलचन साहनी (६० वर्षे), आई फुलिया देवी, दोन भाऊ मिथुन साहनी आणि क्रांती साहनी यांचा समावेश आहे. दुसऱ्या गटाचे सुबोध सिंह, विजय कुमार, अजय कुमार, संजय कुमार, मंजय कुमार आणि रेखा देवी हे जखमी आहेत.

# इस्त्रायलच्या पंतप्रधानांच्या घरावर बॉंबहल्ले

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**तेलअवीव :** गेल्या वर्षभरापासून पश्चिम आशियामध्ये तणावपूर्ण वातावरण आहे. या तणावाच्या पार्श्वभूमीवर इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्या घराला बॉम्बने लक्ष्य करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, उत्तर इस्रायलच्या सीझेरिया शहरात नेतन्याहू यांच्या घराच्या दिशेने दोन फ्लॅश बॉम्ब टाकण्यात आले; पण सुदैवाने हे बॉम्ब घराबाहेरील बागेत पडल्याने जीवीत हानी टळली.

सुरक्षा यंत्रणांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी सीझेरिया शहरात नेतन्याहू यांच्या निवासस्थानाजवळ दोन बॉम्ब टाकण्यात आले. पोलिस आणि अंतर्गत सुरक्षा यंत्रणेच्या संयुक्त निवेदनात सांगण्यात आले, पंतप्रधानांच्या निवासस्थानाबाहेरील बागेत दोन बॉम्ब पडले.

**इस्त्रायलच्या हल्ल्यात दहा ठार**

● शनिवारी, गाझा शहरातील शाती निर्वासित छावणीतील शाळेवर इस्रायलने केलेल्या हल्ल्यात दहा पॅलेस्टिनी ठार तर २० जण जखमी झाले आहेत. या निर्वासित शिबिरात लोकांवर उपचार केले जात असून सध्या ते विस्थापित कुटुंबांना आश्रय देत असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. शाळेत अजूनही लोक ढिगाऱ्याखाली अडकले आहेत. तिथे बचाव कार्य चालू आहे.

### शेजारच्या देशांना धास्ती; आवाजाच्या पाच पटीहून अधिक गती

# हायपरसॉनिक क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**भुवनेश्वर :** 'डीआरडीओ'ने रविवारी (दि.१७) ओडिशाच्या किनारपट्टीवरील एपीजे अब्दुल कलाम बेटावरून लांब पल्ल्याच्या हायपरसॉनिक क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वीरित्या पूर्ण केली. यावर बोलताना संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी 'एक्स'वर पोस्ट करून 'डीआरडीओ'च्या टीमचे कौतुक केले. हे हायपरसॉनिक क्षेपणास्त्र भारतीय सशस्त्र दलाच्या सर्व सेवांसाठी १५०० किमीपेक्षा जास्त श्रेणीसाठी विविध पेलोड वाहून नेण्यासाठी डिझाइन केलेले आहे.

या वेळी ते म्हणाले, की ओडिशाच्या किनारपट्टीपासून दूर असलेल्या डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम बेटावरून लांब पल्ल्याच्या हायपरसॉनिक क्षेपणास्त्राची यशस्वी उड्डाण चाचणी यशस्वी केली. या चाचणीमुळे भारताने एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. हा सर्वांसाठी एक ऐतिहासिक क्षण आहे. या महत्त्वपूर्ण कामगिरीने आपला देशाचा निवडक गटात समावेश झाला आहे. प्रगत लष्करी तंत्रज्ञानाची क्षमता असलेल्या राष्ट्राचे, सशस्त्र दलांचे आणि उद्योगाचे अभिनंदन करतो. दरम्यान, 'आरएम'ओ इंडियाच्या अधिकृत हँडलने मिशनची एक क्लिप पोस्ट केली जिथे क्षेपणास्त्र चाचणी पाहिली जाऊ शकते.

'डीआरडीओ' आणि सशस्त्र दलाच्या वरिष्ठ शास्त्रज्ञांच्या उपस्थितीत ही उड्डाण चाचणी घेतली.

**हायपरसॉनिक क्षेपणास्त्र क्षमता?**

● अहवालानुसार, सध्या जगातील केवळ पाच देशांकडे हायपरसॉनिक क्षेपणास्त्रांची क्षमता आहे. अमेरिका, रशिया, चीन, फ्रान्स आणि भारत; मात्र इराणकडूनही अशा प्रकारच्या क्षेपणास्त्रांची चाचणी घेतल्याचे वृत्त आहे. याशिवाय ब्रिटन, इस्रायल, ब्राझील आणि दक्षिण कोरियामध्ये हे तंत्रज्ञान विकसित केले जात आहे.



'सर्वांना माहित आहे की परदेशात येऊन मालिका जिंकणे किती मोठी गोष्ट आहे, गेल्यावर्षी आपण येथे आलो, तेव्हा १-१ अशी बरोबरी झाली होती. यावेळी आपण २-१ अशी आघाडी झाल्यानंतरही आपण निर्णय घेतला की आपण कसं खेळायला पाहिजे. मला वाटते, प्रत्येकाने जबाबदारी घेतली. त्यामुळे श्रेय प्रत्येकाला जाते.
— सुर्यकुमार यादव

आज ही खेळी संघाला मालिका जिंकण्यासाठी खूप महत्त्वाची होती. मी फक्त मूलभूत गोष्टींचे अनुसरण करण्याचा प्रयत्न करीत होतो. जसे मी गेल्या सामन्यात केले होते. मी शांत होतो. सलग दोन शतके, एक अविश्वसनीय भावना आहे. मी आत्ता ते व्यक्त करू शकत नाही."
— तिलक वर्मा



## महिला आशियाई चॅम्पियन ट्रॉफी : चीनवर ३-० ने मात

# भारताचे वर्चस्व कायम

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** महिला आशियाई अजिंक्यपद करंडक हॉकी स्पर्धेत आपली हुकुमत सिद्ध करताना भारताने बलाढ्य चीनचा ३-० असा पराभव केला. या विजयासह भारताने गटात अव्वल स्थान कायम ठेवले आहे. शनिवारी झालेल्या या सामन्यात भारताकडून संगीता कुमारी (३२ वे मिनिट), सलिमा टेटे (३७) आणि दीपिका (६०) यांनी गोल केले. दीपिका या स्पर्धेत सर्वाधिक आठ गोल करून आघाडीवर आहे.

चीनविरुद्धच्या या सामन्यात भारताने सुरुवातीपासून आक्रमक खेळ केला. पहिल्या काही सेकंदातच भारताला पेनल्टी कॉर्नर मिळाला. दीपिकाने जोरदार फटका मारून गोल करण्याचा प्रयत्न केला; परंतु चीनची गोलरक्षक सुरॉंग वू हिने भक्कमपणे चेंडू अडवला.

भारताच्या या आक्रमक खेळाविरुद्ध चीनला मधूनच प्रतिआक्रमण करता येत होते; मात्र वर्चस्व मिळवणाऱ्या भारताकडून पहिल्या अर्धाला पाच मिनिटे शिल्लक असताना शर्मिलाने मध्य रेषेवरून चेंडू घेत सुनेलिताकडे पास दिला. तिने लगेचच दीपिकाकडे चेंडू दिला; पण गोल थोडक्यात हुकला.

पहिल्या अर्धात गोल शून्य बरोबरी होता. दुसऱ्या अर्धात चीनने आक्रमण केले. त्यांच्या चेंगचेंग लिऊ हिने मारलेला चेंडू भारताची गोलरक्षक बिछूच्या हातून निसटला; परंतु रिबॉंड झालेला चेंडू मारण्यासाठी तेथे चीनची दुसरी खेळाडू नव्हती. आक्रमण-प्रतिआक्रमणाच्या खेळात दुसऱ्या अर्धातही गोल झाला नाही.

तिसऱ्या अर्धात मात्र भारताने आपल्या खेळात अधिक सुसूत्रता आणली. सुशीलाच्या पासवर आक्रमण करणाऱ्या संगीता कुमारीने पहिला गोल केला. पाच मिनिटांनंतर प्रीती दुबे हिने अनमार्क असलेल्या सलिमा टेटेकडे चेंडू दिला आणि तिने कोणतीही चूक न करता चेंडू गोलजाळ्यात मारला. पाच मिनिटांत दोन गोल झाल्यामुळे भारतीयांचा आत्मविश्वास वाढला.

## मोहम्मद शमी पुनरागमनाच्या सामन्यातच ठरला मॅचविनर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** रणजी ट्रॉफी २०२४-२५ स्पर्धेतील पहिला टप्पा शनिवारी संपला. पहिल्या टप्प्यातील शेवटच्या फेरीतील सामन्यातून भारताचा अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीने पुनरागमन केले. शमी नोव्हेंबर २०२३ पासून स्पर्धात्मक क्रिकेटपासून दुखापतीमुळे दूर होता. त्याच्या टाचेवर शस्त्रक्रियाही करण्यात आली. त्यानंतरही त्याला गुडघ्याच्या दुखापतीचाही त्रास जाणवला होता. त्यामुळे त्याचे पुनरागमन लांबले. त्याची निवड आगामी ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठीही करण्यात आलेली नाही.

मात्र आता शमीने पुनरागमनाच्या सामन्यात दमदार कामगिरी करत त्याची दावेदारी ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी ठोकली आहे. त्याने या सामन्यातून त्याची तंदुरुस्ती देखील सिद्ध केली.

शमीने बंगालकडून मध्य प्रदेशविरुद्ध पुनरागमन केले. या सामन्यात बंगालने ११ धावांनी रोमांचक विजयही मिळवला. शमी या सामन्यात बंगालसाठी मॅचविनर खेळाडू ठरला. इंदूरला झालेल्या या सामन्यात बंगालने प्रथम फलंदाजी करताना सर्वबाद २२८ धावा केल्या होत्या. बंगालकडून शाहबाज अहमदने ९२ धावांची खेळी केली, तर कर्णधार अनुस्तुप मुजुमदार याने ४४ धावा केल्या. मध्य प्रदेशकडून गोलंदाजी करताना आर्यन पांडे आणि कुलवंत खेजरोलिया यांनी प्रत्येकी ४ विकेट्स घेतल्या.

त्यानंतर फलंदाजीला उतरलेल्या मध्य प्रदेशला पहिल्या डावात सर्वबाद १६७ धावाच करता आल्या.

## मातोश्री, हेमराज संघाचे विजय



**पुणे :** मातोश्री इलेव्हन, हेमराज मृत्यूंजय यांनी निलेश भिंताडेस्पोर्ट्स फाउंडेशनच्या वतीने आयोजित पुणे जिल्हा टेनिस प्रीमियर एन. बी. ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेत आपापल्या प्रतिस्पर्ध्यावर मात केली. वडगाव बुद्रुक येथील सिंहगड रोडवरील मैदानावर ही स्पर्धा सुरू आहे.पहिल्या लढतीत मातोश्री इलेव्हन संघाने टिंगरे सरकार ग्रुपवर २७ धावांनी मात केली.मातोश्री इलेव्हन संघाने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित ८ षटकांत ३ बाद १०४ धावाकेल्या. दिलीप वर्माने २३ चेंडूंत सात षटकार व दोन चौकारांसह नाबाद ६३ धावाकेल्या. त्याला कर्णधार राजेश पवारची उत्तम साथ लाभली. पवारने १९ चेंडूंत दोन षटकार व तीन चौकारांसह ३३ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल टिंगरे ग्रुप संघाला ८बाद ७७ धावा केल्या. यात धीरज गच्चेने अवघ्या सहा धावांत टिंगरे ग्रुपचा निम्मा संघ गारद केला. 'ड' गटात मातोश्री इलेव्हन संघाचा हा पहिलाच विजय आहे. यानंतर दुसऱ्या लढतीत हेमराज मृत्युंजय संघाने शिरसाठ संघावर ५३धावांनी मात केली. हेमराज संघाने प्रथम फलंदाजी करताना ६ बाद १११ धावापर्यंत मजल मारली. अनिकेत ताकवनेने २१ चेंडूंत पाच षटकार व चार चौकारांसह ५५ धावा केल्या.लक्ष्याचा पाठलाग करताना शिरसाठ स्पोर्ट्स संघाला ७ बाद ५८ धावाच करता आल्या.

## परंदवाल स्पोर्टस क्लबचा मोठा विजय; श्लोकचे द्विशतक



**पुणे :** लायन्स क्लब पुणे रहाटणी च्या वतीने आयोजित लायन्स ज्युनियर लीग १३ वर्षाखालील एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत श्लोक मुसमाडे (नाबाद १६० धावा) याने केलेल्या धडाकेबाज द्विशतकी खेळीच्या जोरावर परंदवाल स्पोर्टस क्लब संघाने २ एन क्रिकेट अकादमी संघाचा ३२८ धावांनी दणदणीत विजय मिळवला. फोर स्टार मैदान हिंजवडी येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत प्रथम फलंदाजी करताना परंदवाल स्पोर्टस क्लब संघाने ५० षटकात ४ बाद ४०८ धावाचे भक्कम आव्हान उभे केले. यात श्लोक मुसमाडेने १११ चेंडूत २८ चौकारासह नाबाद १६० धावांची धडाकेबाज खेळी केली. त्याला पार्थ डी. याने ५९ चेंडूत १० चौकारासह ५५ धावा काढून साथ दिली. या जोडीने दुसऱ्या विकेसाठी ६२ चेंडूत १०१ धावांची भागीदारी करून संघाला चांगली सुरुवात करून दिली. त्यानंतर स्वराज पिंगळे ३०, संस्कार फेरे २७, अर्णव इंगळे नाबाद २७, श्रेयस पवार २२ यांनी धावा केल्या. हे आव्हान २ एन क्रिकेट अकादमी संघ पेलू शकला नाही. त्यांचा डाव १९.५ षटकात सर्वबाद ८० धावावर संपुष्टात आला. यात साईराज विडेने ३९ धावा काढून थोडासा प्रतिकार केला. विजयी संघाकडून विराज फराटे (३-२२), वृषांक खोत (२-१५), ऋषी वर्मा (१-४) यांनी सुरेख गोलंदाजी करत संघाला ३२८ धावांनी विजय मिळवून दिला.

## कसोटी सामन्यापूर्वी स्टार खेळाडू दुखापतीतून सावरला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारतीय संघ बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीसाठी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर पोहोचला आहे. या दौऱ्यात भारतीय संघ यजमान ऑस्ट्रेलियाविरुद्ध पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपची अंतिम फेरी गाठण्यासाठी भारतासाठी ही मालिका खूप महत्त्वाची आहे. कसोटी मालिकेतील पहिला सामना २२ नोव्हेंबरपासून (शुक्रवार) पर्थमधील ऑप्टस स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. या सामन्यापूर्वी टीम इंडियाला आनंदाची बातमी मिळाली आहे.

पर्थ कसोटीपूर्वी भारतीय संघासाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. स्टार फलंदाज केएल राहुलने पुन्हा एकदा नेटमध्ये फलंदाजीला सुरुवात केली आहे. भारत अ विरुद्धच्या सराव सामन्यात राहुलला प्रसिध कृष्णाचा चेंडू लागल्याने दुखापत झाली होती. वेगवान चेंडू राहुलच्या उजव्या हाताच्या कोपराला लागला होता. यामुळे त्याला मैदानाबाहेर जावे लागले होते. मात्र, राहुल आता या दुखापतीतून पूर्णपणे सावरला आहे. पहिल्या सामन्यात कर्णधार रोहित शर्माच्या अनुपस्थितीत केएल राहुल यशस्वी जयस्वालसह डावाची सुरुवात करेल, अशी अपेक्षा आहे.

## 'जर सुरुवात चांगली झाली नाही तर...'

**नवी दिल्ली :** भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील कसोटी मालिकेला सुरुवात होण्यास एका आठवड्यापेक्षा कमी कालावधी शिल्लक आहे. दोन्ही संघ तयारीत व्यस्त आहेत, तर माजी क्रिकेटपटूंनी आगामी बॉर्डर गावस्कर ट्रॉफीबाबत अनेक भाकीत केले आहेत. पर्थमध्ये विजयाची नोंद करून संघाला दमदार सुरुवात करावी लागेल.

जतिन सप्रूच्या यूट्यूब चॅनलवर बोलताना हरभजन सिंग म्हणाला, " टीम इंडिया पुन्हा एकदा बॉर्डर गावस्कर ट्रॉफी जिंकण्याची शक्यता ५०-५० टक्के आहे. मी भारताने अलीकडे खेळलेल्या क्रिकेटचा विचार करत नाही, कारण इथली परिस्थितीत वेगळी होती. चांगल्या फलंदाजाकडे पाहून देखील असे वाटत होते की त्यांना फलंदाजी कशी करावी हे माहित नाही."

## 'माझ्याशी कोणी संपर्कच साधला नाही

# शार्दुल ठाकूरने ऑस्ट्रेलिया दौऱ्यातून वगळण्यावर सोडलं मौन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारताच्या कसोटी संघाचा बहुप्रतिक्षित ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील सामन्यांना २२ नोव्हेंबरपासून सुरुवात होत आहे. या दौऱ्यात भारतीय संघ ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळणार असून या मालिकेतील पहिला सामना २२ नोव्हेंबरपासून पर्थमध्ये खेळला जाणार आहे. दरम्यान, या पाचही कसोटी सामन्यांसाठी भारतीय संघाची निवड यापूर्वीच बीसीसीआयने केली आहे.

या संघात अनेक नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. पण या मालिकेसाठी वेगवान गोलंदाज शार्दुल ठाकूरला संधी मिळालेली नाही. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या.

शार्दुल म्हणाला, 'मी पूर्ण तंदुरुस्त आहे आणि ऑस्ट्रेलिया दौरा मोठा आहे, त्यामुळे संधी कधीही येऊ शकते.'

'त्यानंतर इंग्लंडचा संघही मर्यादीत षटकांच्या मालिका खेळण्यासाठी भारतात येत आहे. चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धाही होणार आहे. त्यामुळे असून बरेच क्रिकेट होणार आहे. त्यामुळे नक्कीच कधीतरी संधी मिळू शकते.'

'सध्या तरी माझे लक्ष माझा फिटनेस आणखी चांगला करण्यावर, माझ्या गोलंदाजीत आणखी सुधारणा करण्यावर आहे आणि मला जेव्हाही मैदानात उतरायचे आहे, तेव्हा माझे सर्वोत्तम द्यायचे आहे.'

## अहान भट्टाचार्य, समायरा चौधरी यांना विजेतेपद



**पुणे :** पुणे मेट्रोपॉलिटन जिल्हा टेनिस संघटना(पीएमडीटीए) यांच्या तर्फे आयोजित पीएमडीटीए मानांकन बाऊन्स टेनिस अकादमी १२ वर्षाखालील ब्रॉन्झ सिरिज टेनिस २०२४ स्पर्धेत अहान भट्टाचार्य, समायरा चौधरी यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून विजेतेपद संपादन केले. बाऊन्स टेनिस अकादमी, लॉ कॉलेज रोड येथील टेनिस कोर्टवर पार पडलेल्या या स्पर्धेत मुलांच्या गटात अंतिम फेरीत अव्वल मानांकित अहान भट्टाचार्यने तिसऱ्या मानांकित आध्रीत गुप्ताचा ४-२, ४-१ असा पराभव करून विजेतेपदाचा मान पटकावला. मुलींच्या गटात अंतिम लढतीत तिसऱ्या मानांकित समायरा चौधरीने दुसऱ्या मानांकित सान्वी गोसावीचा ४-२, ४-१ असा सहज पराभव करून विजेतेपद पटकावले. स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या खेळाडूंना करंडक व प्रशस्तिपत्रक अशी पारितोषिके देण्यात आली.

## सोलापूर, अष्टपैलू संघाची आगेकूच; इकोल टी-२० करंडक - सम्यक शहा, दीपक सामनावीर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** सोलापूर स्टार इलेव्हन संघाने राजस्थान रॉयल्स अकादमी संघाचा तर अष्टपैलू स्पोर्ट्स संघाने सांगली जिल्हा क्रिकेट असोसिएशन संघाचा पराभव करताना इकोल स्पोर्ट्स फाउंडेशनच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इकोल टी-२० करंडक स्पर्धेत विजयी आगेकूच कायम राखली.

शिंदे हायस्कुलच्या मैदानावर झालेल्या पहिल्या लढतीमध्ये सोलापूर स्टार इलेव्हन संघाने राजस्थान रॉयल्स अकादमी संघाला २ गडी राखून पराभूत केले. प्रथम फलंदाजी करताना राजस्थान रॉयल्स अकादमी संघाने निर्धारित २० षटकांत ९ बाद १११ धावा केल्या. यामध्ये अद्वय सिधयेने २५, साव्या गजराजने १६ तर वेदांत पाटीलने १४ धावांचे योगदान दिले. जय पांढरे, पुष्कराज खराडे व अक्षय पांचार्य यांनी प्रत्येकी २ तर बाळकृष्ण काशीद व निखिल दोरनालने प्रत्येकी १ गडी बाद केला. सोलापूर स्टार इलेव्हन संघाने १९.५ षटकांत ८ बाद ११२ धावा करताना विजय साकारला. सम्यक शहाने ३४ धावांची खेळी करताना संघाला विजय मिळवून दिला. त्याला आदर्श नागोजीने १४ तर अक्षय पंचार्यने १८ व कर्णधार बाळकृष्ण काशीदने १६ धावा करताना सुरेख साथ दिली. केदार बजाज, निमिर जोशी, वेदांत पाटील यांनी प्रत्येकी २ तर रवींद्र जाधव व निलय नेवासकर यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला.

दुसऱ्या लढतीमध्ये अष्टपैलू स्पोर्ट्स संघाने सांगली जिल्हा क्रिकेट असोसिएशन (एसडीसीए) संघाला ६ गडी राखून पराभूत केले. प्रथम फलंदाजी करताना एसडीसीए संघाने निर्धारित २० षटकांत ७ बाद १४६ धावा केल्या.

## सर्वोत्तम खेळ करणे हेच विजयाचं सूत्र : सुर्यकुमार यादव

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** संजू सॅमसन आणि तिलक वर्मा यांनी झंझावाती शतके करून उभारलेली २० षटकांतील २८३ ही धावसंख्या आफ्रिकन फलंदाजांना झेपलीच नाही. त्यांचा डाव १४८ धावांत संपुष्टात आला. या मालिकेत सलग दोन शतके करणारा तिलक वर्मा सामन्यात आणि मालिकेत सर्वोत्तम ठरला.

परिस्थितीनुसार खेळात बदल करणे हे आमचे उघड गुपित आहे. गतवर्षी आम्ही जोहान्सबर्गमधील या मैदानात खेळलो तेव्हाही असाच आक्रमक खेळ केला होता. तोच पवित्रा आम्ही यावेळीही कायम ठेवला. उत्तम खेळ करत राहणे हाच आमचा विचार असतो. आम्ही निकाल गृहीत धरून खेळ करत नाही, असे सूर्यकुमार म्हणाला.

## 'तो जे बोलला ते योग्यच...'

**नवी दिल्ली :** या मालिकेला पर्थ येथील पहिल्या सामन्याने सुरुवात आहे. सध्या नुकतीच मायदेशात न्यूझीलंडविरुद्धची कसोटी मालिका गमावल्याने भारतीय संघ आणि कोच गौतम गंभीर दबाव आहे. दरम्यान या मालिकेला सुरुवात होण्यापूर्वी रिकी पॉन्टिंगने मोठे वक्तव्य केले होते, ज्यावर गंभीरने सडेतोड उत्तर दिल्याने त्याच्यावर टीका होत आहे. अशात सौरव गांगुली त्याच्या समर्थनार्थ पुढे आला आहे. एका मुलाखतीत सौरव गांगुलीने म्हटले आहे की, गौतम गंभीर जसा आहे तसाच राहील. गांगुली म्हणाला, "मला असे म्हणायचे आहे की गंभीरला त्याच्या परिस्थितीत सोडले पाहिजे. मी पाहिले की पत्रकार परिषदेत तो जे बोलला त्यावर खूप टीका झाली. तो असाच आहे आणि केकेआरने आयपीएलचे जेतेपद पटकावले होते.

## मुंबईसाठी करो वा मरो परिस्थिती, महाराष्ट्राचे पॅकअप

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारतातील प्रतिष्ठेची देशांतर्गत स्पर्धा म्हणजे रणजी ट्रॉफी. रणजी ट्रॉफी २०२४-२५ हंगामही सप्टेंबरमध्ये सुरू झाला होता. या हंगामातील आता पहिला टप्पा शनिवारी (१६ नोव्हेंबर) संपला. आता दुसरा टप्पा पुढीलवर्षी जानेवारीमध्ये सुरू होणार आहे.

दरम्यान, पहिल्या टप्प्यात अनेक खेळाडूंकडून अफलातून खेळ पाहायला मिळाला. अनेक खेळाडूंनी आपल्या खेळाने प्रभावित केले. काही संघांची अपेक्षेप्रमाणे कामगिरी झाली, तर काही संघांची अगदीच खराब कामगिरी झाली.


प्रत्येक संघ पहिल्या टप्प्यात ५-५ सामने खेळले. ३८ संघात होणाऱ्या या स्पर्धेत मुख्यत: एलिट आणि प्लेट अशी विभागणी केलेली आढळते. एलिटमध्ये ३२ संघांची चार गटात विभागणी करण्यात आली होती. प्रत्येक गटात ८ संघ आहेत.

तसेच प्लेटमध्ये ६ संघ खेळत आहेत. दरम्यान, या पाचही गटांमध्ये बडोदा, विदर्भ, हरियाना, तामिळनाडू आणि गोवा या संघांनी पहिल्या टप्प्यानंतर अव्वल स्थान मिळवले आहे. ए गटात बडोदा, जम्मू-काश्मीर, मुंबई, सेनादल, त्रिपुरा, ओडिशा, महाराष्ट्र आणि मेघालय हे आठ संघ आहेत. या गटात बडोदाने अव्वल क्रमांक मिळवला आहे.

## ब्राझीलच्या व्हिंडरसन नुनेसला केलं पराभूत

# अमेरिकेत भारतीय बॉक्सर नीरज गोयतचा दबदबा!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारतीय बॉक्सर नीरज गोयत नुकताच नेटफ्लिक्सवरील प्रसिद्ध शो द ग्रेट इंडियन कपिल शोमध्ये आला होता. यावेळी त्याने सांगितले होते की अमेरिकेमध्ये होणाऱ्या चॅम्पियनशिपचा तो भाग असणार आहे. आज त्याचा पहिला सामना झाला आणि त्याने कमाल करून दाखवली. आज त्याचा सामना लाईव्ह झाला या सामन्यांमध्ये विजय मिळवल्यानंतर भारतीय प्रेक्षकांनी त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला आहे.

याआधी अंडरकार्ड सुपर मिडलवेट लढतीत नीरज गोयतने भाग घेतला होता. यामध्ये निराजचा सामना ब्राझीलचा बॉक्सर व्हिंडरसन नुनेस विरुद्ध झाला होता. भारतीय बॉक्सरने चमकदार कामगिरी करत एकतर्फी लढतीत व्हिंडरसनचा पराभव केला. मुख्य कार्डापूर्वी दोघांमध्ये ६ फेऱ्यांची लढत झाली, जी नीरजने ५९-५५, ६०-५४, ६०-५४ अशी एकतर्फी जिंकली.

जागतिक बॉक्सिंग परिषद रँकिंगमध्ये स्थान मिळवणारा नीरज हा पहिला भारतीय बॉक्सर आहे. पहिल्या राउंडपासून नीरज गोयतने व्हिंडरसन न्युन्सवर त्याचा दबदबा दाखवला. त्याचे त्याचे वर्चस्व कायम ठेवले. नीरजने त्याला बेदम मारहाण केली आणि त्याच्या चेहऱ्यावर आणि शरीरावर अनेक ठोसे मारले. त्याने १७१ पंच मारले, तर नुनेस केवळ ८७ पंच करू शकला. ३३ वर्षीय भारतीय बॉक्सरने गेल्या पाच सामन्यांपैकी चार सामने जिंकले आहेत. नीरज गोयत त्याच्या पहिल्याच सामन्यात कमालीची कामगिरी करून दाखवली. त्याने गेल्या वर्षी फाकोर्न अम्योदविरुद्ध तांत्रिक बाद फेरीत विजय मिळवला होता. त्याचा प्रतिस्पर्धी न्युनेसने बॉक्सिंगमध्ये नुकतेच व्यावसायिक पदार्पण केले. याआधी तो सोशल मीडियावर प्रभाव टाकणारा होता.